RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर वर्ष ३४ वे अंक १७१ वा गुरूवार, दिनांक २५ सप्टेंबर २०२५ (सांज. दैनिक) पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26 पृष्ठे – ६ मो:९४२२४७२५०२ किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील

संपर्क


जडे ऑफसेट प्रिंटर्स



मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८

# धीर सोडू नका, टोकाचे पाऊल उचलू नका

## उद्धव ठाकरेंचं पूरग्रस्त शेतकऱ्यांना आवाहन



लातूर/प्रतिनिधी : महाराष्ट्रात अतिवृष्टीचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी महाराष्ट्र सरकार खंबीरपणे उभं असून, त्यांना सर्वतोपरी मदत दिली जाईल. आतापर्यंत २,२१५ कोटींची मदत जाहीर करण्यात आली आहे. तसेच प्रचलित निकषांमध्ये शिथिलता आणून शेतकऱ्यांना आणखी मदत दिली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बुधवारी लातूर दौऱ्यावर होते. तर आज उद्धव ठाकरेंनी लातूरला भेट दिली. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांनी नुकसानग्रस्त भागांचा आढावा घेतला.

**काय म्हणाले उद्धव ठाकरे?**

मी शेतकऱ्यांना धीर द्यायला आलो आहे. कुणीही आस्मानी संकटामुळे खचून जाऊ नका, वेडंवाकडं पाऊल उचलू नका. हे माझं तुम्हा सगळ्या शेतकऱ्यांना आवाहन आहे. शेतकरी संकटात सापडला आहे. आम्ही सरकारकडून जी मदत तातडीने हवी आहे ती आम्ही मिळवून देऊ. शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत केली जावी आणि कर्जमुक्ती करावी या मागणीसाठी आम्हीही आग्रही राहू. तातडीची मदत सरकारला देऊ द्या त्यानंतर बाकीच्या गोष्टीही आपण पाहू. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचीही मागणी आम्ही करणार आहोत. असं उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. गुरूवारी उद्धव ठाकरेंनी लातूरच्या काटगाव या ठिकाणी उद्धव ठाकरे आले होते. त्यानंतर उद्धव ठाकरे हे धाराशिव, बीड, छत्रपती संभाजी नगर आणि जालना या ठिकाणीही जाणार आहेत.

**उद्धव ठाकरे पाच जिल्ह्यांचा दौरा करणार**

उद्धव ठाकरे यांनी लातूरमधल्या काटगाव या ठिकाणी गेले होते. तिथे त्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची भेट उद्धव ठाकरेंनी घेतले. पिकांची पाहणीही उद्धव ठाकरेंनी केली. एका दिवसात उद्धव ठाकरे पाच जिल्ह्यांचा दौरा करणार आहेत. मराठवाड्यातले जिल्हे त्याचप्रमाणे सोलापूर या ठिकाणी पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांना आणि गावकऱ्यांना स्थलांतरित करावे लागले आहे. आता उद्धव ठाकरे हे शेतकऱ्यांच्या बांधावर गेले होते. त्यावेळी त्यांनी पूरग्रस्तांना हेक्टरी ५० हजार रुपये तातडीची मदत सरकारने जाहीर करावी अशीही मागणी उद्धव ठाकरे यांनी केली.

## महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांनी रेणापूर तालुक्यातील नुकसानीची केली पाहणी



महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांनी गुरूवारी सकाळी रेणापूर तालुक्यातील मोटेगाव येथे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. तसेच शेतकऱ्यांकडून नुकसानीबाबत माहिती घेतली. तसेच राज्यमंत्री श्री. कदम हे सध्या रेणापूर तालुक्यातील दिघोळे देशमुख येथे नुकसानीची पाहणी करत आहेत

## लातुरातील औसा रोडवर एकाला चिरडले



**लातूर/प्रतिनिधी :** येथील औसा रोडवर गुरूवारी सकाळी अपघात झाला असून एका तरुणाच्या डोक्यावरून गाडी गेल्याचे सांगण्यात येते. हा अपघात पाहणाऱ्याच्या काळजाला पाझर फुटला होता. सदरील तरूण युपीचा असून १९ वर्षीय आहे. या रोडवर सतत गर्दी व बेशिस्तीची वाहतुक पाहण्यास मिळते. वाढत्या अपघातामुळे या भागाकडे प्रशासनाने वेळीच लक्ष देण्याची गरज आहे.

## महानगरपालिके मार्फत स्वच्छता हि सेवा पंधरवाडा अंतर्गत सायकल रॅली संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर महानगरपालिके मार्फत शासनाच्या आदेशाप्रमाणे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर स्वच्छता हि सेवा पंधरवाडा आयोजित करणेबाबत आदेशित केले असून आज दिनांक २४/०९/२०२५ रोजी आपलं लातूर सायकलोत्थान २०२५ कार्यक्रमाचे जिल्हाधिकारी कार्यालय, बार्शी रोड लातूर ते गंज गोलाई ते लातूर शहर महानगरपालिका पर्यंतचे आयोजन करण्यात आले सदर रॅलीस मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी हिरवा झेंडा दाखवुन सुरूवात केले.




स्वच्छता ही सेवा २०२५ पंधरवाडा निम्मीत विविध कार्यक्रम लातूर शहर महानगरपालिका येथे आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांच्या आदेशानुसार तसेच उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रम घेण्यात येत आहे.

सदर रॅलीमध्ये मुख्य स्वच्छता अधिकारी श्री कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख. श्री.रमाकांत पिडगे, मुख्य स्वच्छता निरीक्षक श्री.रवी कांबळे, श्री.धोंडिबा सोनवणे, श्री.शिवराज शिंदे, श्री.अक्रम शेख तसेच स्वच्छता निरीक्षक व लातूर सायकलिस्ट क्लबचे, श्रावण उगले, उपाध्यक्ष प्रतापसिंग बिसेन, सचिव श्रीरंग मद्रेवार, साकलिष्ट सदस्य शब्बीर शेख, अभिजित देशपांडे, कुस्तीपटू चेतन जावळे, भाग्यश्री शिंदे, गंगाधर बिराजदार, संदेश महिंद्रकर व इतर उपस्थित होते.

## रेणा सहकारी साखर कारखान्याची २७ सप्टेंबर रोजी मा.अधिमंडळाची २३ वी वार्षीक सर्वसाधारण सभा

### सभासद शेतकरी यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**दिलीपनगर निवाडा :** सहकार क्षेत्रात अल्पावधीतच नावारूपाला आलेल्या रेणापूर येथील रेणा सहकारी साखर कारखान्याची मा. अधिमंडळाची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा कारखान्याचे चेअरमन मा.श्री.अनंतराव ठाकूर-देशमुख साहेब यांच्या अध्यक्षतेखाली दि २७ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

ही सर्वसाधारण सभा लातूर येथील वैष्णव हॉटेल, बँक्वेट हॉल, साई नाका, डीमार्ट रिंगरोड, लातूर येथे दुपारी २ वाजता संपन्न होणार आहे. सदरील वार्षिक सर्वसाधारण सभेस कारखान्याचे मार्गदर्शक संस्थापक माजी मंत्री सहकारमहर्षी मा.श्री. दिलीपराव देशमुख साहेब, माजी मंत्री तथा महाराष्ट्र विधी मंडळ मुख्य प्रतोद मा.आ.श्री. अमित विलासराव देशमुख साहेब,खासदार डॉ. शिवाजी काळगे साहेब, लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख साहेब यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या सर्वसाधारण सभेत सभासद शेतकऱ्यांसाठी केंद्र शासनाने राज्यघटनेत केलेल्या ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार कारखान्याचे सभासद यांना प्रशिक्षण सदरचे दिवशी सकाळी ११.०० वाजता सभेच्या स्थळी आयोजित करण्यात आले आहे तरी शेतकरी सभासदांना वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन कारखान्याचे चेअरमन मा. श्री. अनंतराव ठाकूर-देशमुख, व्हा चेअरमन अँड श्री.प्रविण पाटील,सर्व संचालक व कार्यकारी संचालक बी व्ही मोरे यांनी केले आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



सर्व निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना दिवाळी अगोदर सरसकट मदत - सीएम

## चिमटा दयाचा



अतिवृष्टी भागात मान्यवरांचे दौरे झाले आहेत !
आता मदतीची आशा उंचावली आहे !!
खात्यात मदत जमा झाल्यावर खरा आनंद होणार आहे !!!

## घरफोडीच्या गुन्ह्यातील दोघा कडून ०६ लाख ३८ हजार रुपयाच्या दहा तोळे सोन्याच्या दागिन्याचे मुद्देमालासह अटक.. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** घरफोडीच्या गुन्ह्यातील दोघा कडून ०६ लाख ३८ हजार रुपयाच्या दहा तोळे सोन्याच्या दागिन्याचे मुद्देमालासह अटक.. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई याबाबत थोडक्यात माहिती की, काही दिवसांपूर्वी पोलीस ठाणे एमआयडीसीच्या हद्दीमध्ये बंद घरचा कडीकोंडा तोडून आत मध्ये प्रवेश करून सोन्या चांदीचे दागिन्याची चोरी केल्याची घटना घडली होत्या. त्यावरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीता विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक अमोल तांबे अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथके तयार करून गुन्ह्याचा तपास करण्यात येत होता. सदर पथकाकडून गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना पथकाला बंद घराचे कडीकोंडा तोडून चोरी करणाऱ्या आरोपीची माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून दिनांक २३ सप्टेंबर रोजी पथकाने स्वराज्य नगर परिसरातून दोन आरोपींना ताब्यात घेतल. त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव मतिन सय्यद, वय २१ वर्षे रा. स्वराज नगर, पाखरसांगवी, लातूर. अभिषक यादव, वय २१ वर्षे रा. स्वराज नगर, पांखरसांगवी.लातूर असे असल्याचे सांगितले. त्याची झडती घेतली असता त्याच्या जवळ त्यांनी चोरी केलेले सोन्याचे १०३.१७ ग्राम वजनाचे दागिने व गुन्ह्यात वापरलेली स्कुटी असा एकूण ०६ लाख ३८ हजार ८११ रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आले. सदरचा मुद्देमाल नमूद आरोपींनी त्यांच्या आणखीन दोन साथीदारासह मिळून पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीमधील १२ नंबर पाटी परिसरातील बंद घराचे कडी कोंडे तोडून चोरी केल्याचे नमूद आरोपींनी कबूल केले आहेत. आरोपींना त्यांनी चोरलेल्या मुद्देमालासह पुढील कारवाई करिता पोलीस ठाणे एमआयडीसी यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.



सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक डोके, सदानंद भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे , सपोउपनि सर्जेराव जगताप, पोलीस अंमलदार अर्जुन रजपुत, रामलिंग शिंदे, मोहन सुरवसे, रियाज सौदागर, मनोज खोसे, जमीर शेख, राहुल कांबळे, गणेश साठे, शैलेश सुडे, चंद्रकांत केंद्रे, खांडेकर, चोपणे, महिला पोलिस अमलदार अंजली गायकवाड यांनी केली आहे.

## पोलीस ठाणे शिवाजीनगर हद्दीमध्ये घडलेल्या खुनाच्या गुन्ह्यातील दोन फरार आरोपींना अटक; चार दिवसाची पोलीस कोठडी

**लातूर/प्रतिनिधी :** पोलीस ठाणे शिवाजीनगर हद्दीमध्ये घडलेल्या खुनाच्या गुन्ह्यातील दोन फरार आरोपींना अटक; चार दिवसाची पोलीस कोठडी याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक १७ ते १८ सप्टेंबर रोजीचे मध्यरात्री १२.४५ वाजण्याचे सुमारास पाच नंबर चौक ते औसाकडे जाणारे बायपास रोडने लहुजी साळवे चौक, लातुर येथे गाडीला कट मारण्याच्या कारणावरून क्रुझर गाडीमधून आलेल्या चौघांनी ईरटीका गाडी मधील प्रवाशांसोबत भांडण तक्रारी करून त्यांना शिवीगाळ करुन लाथा बुक्याने मारहाण केली त्यातील एकाने हातातील चाकुने ईरटीका गाडी मधील अनमोल केवटे याचेवर वार करुन खुन केला व सहप्रवासी सोनाली भोसले यास जीवे मारण्याचे उद्देशाने चाकूने भोसकून गंभीर जखमी केल्याची घटना घडली होती. त्यावरून पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमूद गुन्ह्याच्या घटनास्थळास तात्काळ वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी भेट देऊन तपासाबाबत सुचना केल्या त्यानुसार तपासाकरिता पथक नेमण्याबाबत आदेशीत केले. गुन्हा केल्यानंतर फरार झाले होते. पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे यांनी गुन्ह्यातील फरार आरोपींचा तात्काळ शोध घेण्याचे निर्देशित केले होते.

उर्वरित दोन आरोपी विष्णु ऊर्फ संदीप शिवाजी मामडगे, वय २८ वर्षे रा-हणुमंतवाडी ता. रेणापुर जिल्हा, लातुर. मंथन चंद्रकांत मामडगे वय २१ वर्षे रा- श्रीराम विद्यालय शाळेसमोर, रेणापुर ता- रेणापुर जिल्हा. लातूर. यांना दिनांक २२/०९/२०२५ रोजी रात्री १०:३० वाजण्याच्या सुमारास अटक करण्यात आली असून त्यांना आज दिनांक २३/०९/२०२५ रोजी मा.न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने नमूद आरोपींना चार दिवसाची पोलीस कस्टडी सुनावली आहे.

गुन्ह्याचा तपास वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे शिवाजीनगर चे सहाय्यक पोलीस निरीक्षक जिरगे हे करीत आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## अमेरिकेला विचार करावा लागेल!

भारत आणि अमेरिका दरम्यान पुन्हा एकदा टॅरिफ वरून तणाव वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या महासभा म्हणजे युएनजीएच्या वार्षिक बैठकीत उच्चस्तरीय चर्चेच्या पहिल्या दिवशी जागतिक नेते न्यू यॉर्क शहरात एकत्र आले आहेत. या बैठकीच्या पहिल्याच दिवशी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा रशियन तेल खरेदीवरून भारत आणि चीनवर निशाणा साधला आणि युरोपिअन युनिअनला दोन्ही आशियाई देशांवर टॅरिफ लादण्याचे जागतिक मंचावरून आवाहन केले. त्याचवेळी, ट्रम्प यांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी भारतावरील अतिरिक्त २५% टॅरिफवर महत्त्वाचे विधान केले आहे ज्यामुळे संभ्रम निर्माण होऊ शकतो. एकीकडे ट्रम्प यांनी भारतावर रशियन तेल खरेदी करून युक्रेन युद्धामध्ये आर्थिक साहाय्य पुरवल्याचा हवाला देऊन २५ टक्के अतिरिक्त टॅरिफचा बोजा लादला तर दुसरीकडे, आता ट्रम्प प्रशासन भारतावरील हाच कराचा भार कमी करायचा विचार करत आहेत. अशा परिस्थितीत, ट्रम्प यांना नेमके काय करायचे आहे याबाबत पुन्हा एकदा प्रश्न निर्माण होत आहेत. अलीकडेच भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी रशियाच्या तेल खरेदीसाठी भारतावर लादलेल्या शुल्काचा पुनर्विचार करण्याचे संकेत दिले. रुबियो यांनी रशियाविरुद्ध युरोपियन निर्बंध अधिक कडक करण्याची गरज व्यक्त केली. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी म्हटले की, डोनाल्ड ट्रम्प प्रशासन रशियाच्या तेल खरेदीवर भारतावर लादलेले अतिरिक्त २५ टक्के शुल्क 'फिक्स' करण्यास तयार होऊ शकते. युरोपीय राष्ट्रांनी रशियाविरुद्ध स्वतःचे निर्बंध वाढवावेत अशी अमेरिकेची अपेक्षा आहे. रुबियो पुढे म्हणाले की, अमेरिकेने भारताविरुद्ध उपाययोजना केल्या असल्या तरी, 'आम्हाला आशा आहे की आम्ही ते दुरुस्त करू शकू सध्याला भारताकडून टेरिफबाबत विचार करून स्वदेशी व स्वावलंबनची तयारी दर्शविली आहे. भारतावर अधिक विविध मार्गाने कर लावुन जेरीस आणण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे. वास्तविक भारत रशियाकडून तेल अनेक वर्षापासून खरेदी करीत आला आहे. भारत आणि रशियाची मैत्री अनेक वर्षाची आहे. व्यापाराच्या सुत्रानुसार जे दर भारताला परवडेल तेच दराने भारत वस्तू खरेदी करेल. असे जरी असले तरी प्रत्यक्षात अमेरिकेचा विविध मार्गाने जो दबाव तंत्र आवलंबत आहे तसे पाहिले तर त्याला यश मिळणार नाही. वरचेवर दबावासाठी मार्ग शोधले जात आहेत. तरी भारताने आपल्या भुमिकेत कोणताही बदल केला नाही. आपल्या भुमिकेवर ठाम आहे. तसे पाहिले तर भारत अमेरिकेच्या निर्बंधाला घाबरला नाही. उलट जो माल अमेरिकेकडून मागवावा लागतो त्याच मालाची निर्मिती करण्याचा संकल्प केला आहे. भारतीयांना जे पंतप्रधानांनी स्वातंत्र्यदिनी आवाहन केले आहे त्याला भारतीयांनी साथ दिली आहे. भारत वरचेवर आपल्यात स्वयंपुर्णता निर्माण करीत आहे. स्वदेशी व स्वालंबन ही काळाची गरज आहे. त्याशिवाय भारताची प्रगती होवू शकत नाही. भारत काही झाले तरी रशियाची साथ सोडू शकत नाही. अनेक वर्षाची मित्रता कोणाच्यातरी दबावापुढे तुटणार नाही. हे ओळखून भारताचे योग्य पावुल पडत आहेत. भारताने आज पर्यंत जे निर्णय घेतले त्यावर ते ठाम आहेत असेच कृत्य दिसून येते. पंचवीस टक्के टेरिफ याला विरोध नव्हता मात्र पन्नास टक्के करणे म्हणजे त्रास देण्याचे आहे हे जगाने ओळखले आहे. त्याच प्रमाणे आज पर्यंत जे चालत आले व जगा वेगळा कर लावणे योग्य नाही. अशा धुर्त प्रवृतीस भारताचा विरोध आहे. परत नुकतेच व्हिसा बाबत निर्णय घेतला तो जाचक आहे. जसे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी सुत्रे हाती घेतल्यापासून भारताविषयी वेगवेगळे विधान करीत आहेत. काय बोलावे व कोणत्या बाबीला ठाम राहावे याचा विचार करीत नसल्याचे दिसून येत आहे. वास्तविक भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेली भुमिकेबाबत विचार केला पाहिजे. भारत हा झुकणारा देश नाही. हे ओळखून आपले ट्रम्प यांनी हासू करून घेऊ नये असे सर्वांना वाटत असले तरी प्रत्यक्षात दबाव निर्माण करण्यासाठी मार्ग शोधत आहेत तरी त्यांना यश मिळणार नाही. अमेरिकेची भारत ही मोठी बाजारपेठ आहे. भारतीय मोठे खरेदीदार आहेत. त्याच प्रमाणे अमेरिकेत भारतीय मोठ्या संख्येने राहातात. याची जाण ठेवुन ट्रम्प यांनी पावले उचलण्याची गरज आहे. भारत सतत सहकार्याची भुमिका घेऊन वाटचाल करीत असताना व्हिसा बाबत नवा नियम लागू केला आहे. याला विरोध होत आहे. मुळात अमेरिकेतील काही तज्ज्ञ मंडळी ट्रम्प यांच्या निर्णयास विरोध आहे. त्यांना सांगत असले तरी प्रत्यक्षात सुधारणा होणे आवघड आहे. भारतात आता बॅटऱ्या बनविण्याबरोबर मोबाईल उत्पादने मोठ्या प्रमाणात सुरू केले आहे. मोबाईल क्षेत्रात भरारी घेतली जात आहे. भारताने आता जीएसटी करात कपात केली आहे. अठ्ठावीस टक्क्याची प्रणाली रद्द करून आठरा टक्के आणली आहे. काहीं वस्तू जीएसटीतून वगळण्यात आल्या ही मोठी जतनेसाठी फायद्याची बाब आहे. त्याच प्रमाणे बारा टक्के कर आकारणी होते ती काही बाबतीत पाच टक्के आकारली जाणार आहे. त्यामुळे भारतात निश्चित महागाई कमी होणार आहे. ग्राहकांची मागणी आता भारतीय बनावटीच्या वस्तूची मागणी होणार आहे हे निश्चित आहे. भारतीयांना स्वदेशी माला बाबत आवड निर्माण झाली आहे. आता ज्या भारतीय बनावटीच्या वस्तू तयार होतात त्या परदेशीय उच्च कंपन्यासारख्या बनविल्या जात आहेत. त्यामुळे परदेशीय मालाची खरेदी मंदावणारा आहे. त्याच प्रमाणे स्वदेशी व स्वावलंबनाचा परिणाम आगामी काळात होणार आहे. त्यामुळे अमेरिकेला काही दिवसानंतर आर्थिक घसरणीची चाहूल लागणार आहे. अमेरिका सतत भारतावर दबाब निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. याला म्हणावे तेवढे यश मिळणार नाही. मात्र अमेरिका हा दबाब टाकत राहाणार आहे. याच्या विरोधात कसा मुकाबला करावयाचा याचा विचार भारतीयांनी सतत करण्याची गरज आहे.

# डॉ. संदीपान जगदाळे यांचा दयानंद शिक्षण संस्था व आवर्तन प्रतिष्ठान मार्फत भव्य गौरव सोहळा संपन्न





**लातूर/प्रतिनिधी :** शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नवनवीन उपक्रम राबवणारे प्रा. डॉ. संदीपान जगदाळे यांना यंदाचा राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे. या मानाच्या पुरस्कारानंतर दयानंद शिक्षण संस्था व आवर्तन प्रतिष्ठान यांच्या वतीने त्यांचा सपत्नीक विशेष सत्कार करण्यात आला.

या समारंभात डॉ. संदीपान जगदाळे व त्यांच्या पत्नी सौ. अभिश्री जगदाळे यांच्या सन्मानार्थ महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री मा. दिलीपरावजी देशमुख, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी, श्री. रमेशकुमार राठी, सचिव श्री. रमेश बियाणी, कोषाध्यक्ष श्री. संजय बोरा, संयुक्त सचिव श्री. विशाल लाहोटी, नियामक मंडळ सदस्य श्री. विशाल अग्रवाल, डॉ. जयप्रकाश दरगड, आवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. अभय शहा, सचिव डॉ. रवीराज पोरे, श्री. आबासाहेब पाटील, श्री. संभाजी सुळ, श्री. विशाल जाधव आदी मान्यवर, संस्थेचे सदस्य, प्राध्यापक, कर्मचारी व शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी अर्थ व नियोजन राज्यमंत्री मा. दिलीपराव देशमुख यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "डॉ. संदीपान जगदाळे यांनी शिक्षण क्षेत्रात नवनवीन अध्यापन पद्धती विकसित करून शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी केलेले प्रयोग अत्यंत स्तुत्य आहेत. जीवनाचा सर्वांगीण विकास घडवायचा असेल तर कलेला महत्त्व द्यावे लागते. कला आणि संगीत जीवनातील एकसुरीपणा घालवून जीवन समृद्ध करतात. भारतीय संगीत जगात सर्वोच्च आहे; पाश्चात्य संगीत फक्त मेंदूपर्यंत पोहोचते, परंतु भारतीय संगीत हृदयाला स्पर्श करते. समाजाभिमुख कार्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले योगदान लक्षणीय असून, याची दखल घेऊन त्यांना राष्ट्रीय पातळीवरील हा मानाचा सन्मान मिळालेला आहे. हा गौरव संपूर्ण महाराष्ट्रातील शिक्षक समाजाचा अभिमान आहे." दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी म्हणाले, "प्रा. डॉ. संदीपान जगदाळे यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याने लातूर जिल्ह्याची तसेच कला व संगीत क्षेत्राची एक नवी ओळख निर्माण झाली आहे. देशमुख घराणे आणि दयानंद शिक्षण संस्थेचे नाते सुरुवातीपासूनच जिव्हाळ्याचे राहिले आहे. भविष्यात फिजिओथेरपी, नर्सिंग आणि सीबीएससीच्या माध्यमातून ज्ञानाच्या कक्षा रुंदवण्यासाठी संस्था सतत प्रयत्नशील राहील."

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव श्री. रमेश बियाणी यांनी केले. आपल्या प्रस्ताविकेत त्यांनी नमूद केले की, "संस्था नेहमीच कला, क्रीडा, नाटक, संगीत यांना प्राधान्य देत असते. विद्यापीठ आयोजित युथ फेस्टिवलमध्ये कला व वाणिज्य महाविद्यालयाला दरवर्षी प्रथम व द्वितीय क्रमांकाचे मानांकन मिळणे अभिमानास्पद आहे. भविष्यात संगीताचा रोडमॅप तयार करून संस्था ऑनलाईन प्रशिक्षण व संशोधन क्षेत्रातही अग्रेसर राहील."

राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कर्ते प्रा. डॉ. संदीपान जगदाळे यांनी मनोगतात व्यक्त केले की, "मी एका छोट्याशा गावातून महाविद्यालयीन शिक्षणासाठी दयानंद शिक्षण संस्थेत आलो आणि इथूनच माझ्या जीवनाला यशाच्या पायऱ्या चढण्याची संधी मिळाली. संस्थेने दिलेले स्वातंत्र्य, पाठिंबा आणि प्रोत्साहन यामुळेच आज शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च मानाचा पुरस्कार मला मिळाला आहे. हे यश म्हणजे दयानंद शिक्षण संस्थेच्या प्रेरणेचे फलित आहे."

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. गणेश लहाने यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. अभय शहा यांनी मानले.

# भाषा व साहित्याच्या अभ्यासासोबत विद्यार्थ्यांनी कौशल्य विकसित करावीत– डॉ. मनोहर भंडारे




**निलंगा/प्रतिनिधी :** जग अत्यंत जलद गतिने धावत आहे, यातूनच स्पर्धा निर्माण होत आहे. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी हिंदी, मराठी व इंग्रजी साहित्याच्या अभ्यासा सोबत विविध कौशल्यात प्राविण्य मिळवावे . जगात एकीकडे बेकारीचे लोंढेच्या लोंढे पाहायला मिळतात तर दुसरीकडे मात्र कौशल्यात प्रविण व पारंगत असलेल्या विद्यार्थ्यांची कमतरता जाणवत आहे. याच संधीचा लाभ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी घ्यावा व आपले करिअर समृद्ध करावे असे प्रतिपादन हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर येथील प्राध्यापक डॉ. मनोहर भंडारे यांनी केले.

निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्या वतीने हिंदी पंधरवाडा व भाषा व वाङ:मय मंडळाच्या उदघाटन प्रसंगी ते प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते. मार्गदर्शनाच्या शेवटी त्यांनी ज्यांना उत्तम बोलता येते त्यांनी निवेदकाचे कौशल्य शिकावे, ज्यांना उत्तम लिहिता येत त्यांनी लेखन कींवा पत्रकारितेत प्रवेश करावा, ज्यांना अनेक भाषेचे ज्ञान आहे त्यांनी अनुवादकाची भूमिका निभवावी. अशा बऱ्याच ठिकाणी भाषेच्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम हे होते.अध्यक्षीय समारोप प्रसंगी त्यांनी "लहरों से डर कर नौका पार नहीं होती, कोशिश करने वालों की कभी हार नहीं होती" या हरिवंशराय बच्चन यांच्या कवितेच्या गायनाने कार्यक्रमाची रंगत वाढवली.

या प्रसंगी विचारमंचावर उपप्राचार्य तथा मराठी विभाग प्रमुख डॉ.भास्कर गायकवाड, हिंदी विभागप्रमुख डॉ.बालाजी गायकवाड , इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.अजित मुळजकर , डॉ.हंसराज भोसले, डॉ.मुल्ला मुस्तफा, डॉ. विजय कुलकर्णी ,प्रा.मनिषा घोगरे आदी उपस्थित होते. तसेच हिंदी पंधरवाड्याच्या निमित्ताने निबंध, शुध्द लेखन , सामान्य ज्ञान, पोस्टर स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. यात तिसरे बक्षीस कु.सय्यद सानिया जैनुद्दीन , दुसरे बक्षीस-कु. सुरवसे शिवदिक्षा गोविंद तर पहिले बक्षीस कु.सुर्यवंशी नेहा वामन यांनी पटकावले.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ हिंदी,मराठी , इंग्रजी वाङ:मय मंडळाच्या अध्यक्षपदी क्रमशः कु.मुस्कान पठाण,कु.सुप्रिया इबीते, कु.शुभांगी कांबळे यांची निवड करण्यात आली. तर सचिव पदी कु.रुपाली काळे, कु.नेहा लामतुरे, कु.श्रध्दा परांडे यांची निवड करण्यात आली. वाङ:मय मंडळ पदाधिकाऱ्यांचे मान्यवरांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले या प्रसंगी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते हिंदी साहित्यिकांवर तयार करण्यात आलेल्या भीत्तीपत्रिकेचे विमोचन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन -नियोजन डॉ.गोविंद शिवशेट्टे यांनी घडवून आणले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी विभागाची विद्यार्थिनी कु.मुस्कान पठाण , सुत्रसंचालन अली सुमैय्या व अश्विनी कांबळे तर आभार रुपाली काळे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री.सिध्देश्वर कुंभार व श्री. सुनिल वाकळे यांनी परिश्रम घेतले.

# सुपर्ण जगताप यांना कै. विजयकुमार मलकलपट्टे स्मृती पर्यावरण रक्षक गौरव पुरस्कार



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील सह्याद्री देवराई प्रकल्प बोडक्या डोंगरावर राबवणारे वृक्ष प्रेमी, पर्यावरण रक्षक, लातूर मनपा प्रदूषण नियंत्रण समिती सदस्य सुपर्ण जगताप यांना उदगीर येथील कुमार बागेत २३ सप्टेंबर रोजी संपन्न झालेल्या एका कार्यक्रमात कै. विजयकुमार मलकलपट्टे स्मृती गौरव समितीने कै.विजयकुमार मलकलपट्टे स्मृती पर्यावरण रक्षक गौरव पुरस्कार रोख २५ हजार व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

कै. विजयकुमार मलकलपट्टे यांनी उदगीर शहरात एक खूप मोठे हरित क्षेत्र निर्माण केले होते. आज त्यांचा २३ सप्टेंबर हा त्यांचा पाचवा स्मृतिदिन. यानिमित्त सुपर्ण जगताप यांना त्यांच्या स्मृती पित्यर्थ पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मागील वीस वर्षापासून लातूर जिल्ह्यात, मराठवाड्यात पर्यावरण विषयक कार्य करत असलेले सुपर्ण जगताप यांना हा कै. विजयकुमार मलकलपट्टे पर्यावरण रक्षक गौरव पुरस्कार बार्शीच्या जिल्हा न्यायाधीश सौ. वैशाली श्रीनिवास रेड्डी, प्रा.डॉ. साधना पन्हाळे, राष्ट्रीय पुरस्कार विजेते विश्वंभरराव मुडपे गुरुजी, डॉ अनिल भिकाने, आर्यभट्ट मलकलपट्टे, तृष्णा बरुरे मलकलपट्टे,धनराज बरुरे यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी अमृत सोनवणे, दिपक मंदाडे, अँड अजय डोणगावकर जिव्हाळा ग्रुपचे सदस्य उदगीर येथील अनेक मान्यवर हे देखील उपस्थित होते.

२०११ ते १३ मध्ये सुपर्ण जगताप यांनी लातूर शहरात पर्यावरण विषयक एक मुव्हमेंट चालवली त्याची सुरुवात लातूरच्या दयानंद सभागृहात प्लास्टिक विरोधी माझं लातूर स्वच्छ लातूर - माझं लातूर हरित लातूर हे अभियान राबवून केली. या मध्ये दिलीपराव देशमुख, पोलीस उपाधीक्षक तिरुपती काकडे, माजी आमदार वैजनाथ शिंदे, महापौर स्मिता खानापुरे, पप्पू कुलकर्णी, अँड मनोहरराव गोमारे, अतुल ठोंबरे, होते या मध्ये विविध म्हणजे वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ दिप्ती डोणगावकर, उपजिल्हाधिकारी बप्पा थोरात, तहसीलदार महेश सावंत, अतुल देऊळगावकर, सतीश नरहरे हे सर्व सहभागी झाले होते.

त्यावेळी ५ जुनं २०१२ पर्यावरण दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाने त्यांचा व सहका-यांचा राज्य पुरस्कार २५ हजार रु व ट्रॉफी देऊन गौरव केला. डॉ प्रकाश बाबा आमटे यांनी समाजाचे आधारस्तंभ म्हणून गौरव केला. २०१५ रोजी सर्वात प्रथम लातूर वृक्ष चळवळ ज्यामुळे आज लातूर हरितमय आहे ही मुख्य संकल्पना व सुरुवात सुपर्ण जगताप यांनी केली. नंतर सह्याद्री देवराई सोबत लातूर जिल्ह्यात वन विभागाच्या सोबत एक सह्याद्री देवराई हा प्रकल्प तीन बोडक्या डोंगरावर उभा केला. अनेक दुर्मिळ वनस्पती संवर्धन, बीज महोत्सव, चला सावली पेरुया या सारखे उपक्रम मराठवाड्यात राबवले. लातूर प्रदुषण नियंत्रण समिती,लातूर शहर फेरीवाला धोरण समिती, व लातूर शहर वृक्ष प्राधिकरण समिती वर सदस्य म्हणून ते आहेत.

# कर्तृत्वशील नवदुर्गा – सामाजिक जाण असलेल्या संवेदनशील सामाजिक कार्यकर्त्या : सौं. मृणालिनी मैंदर्गीकर

नवरात्रीच्या नऊ रात्री म्हणजे स्त्री शक्तीचा गौरवाचा पर्वच.आपण आदिशक्तीच्या नऊ रूपांची पूजा करून तिच्या सामर्थ्याचा सन्मान करतो. महाराष्ट्राच्या मातीत अनेक स्त्रिया अशा घडल्या आहेत.ज्यांनी शिक्षण, कला, क्रीडा, विज्ञान, उद्योग, समाजकारण, प्रशासन व पोलीस दल अशा विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे.असाच ठसा सोलापूर शहरातील सोनार समाज संस्था सोलापूर शी संलग्न वसुंधरा महिला मंडळाच्या अध्यक्षा सौं. मृणालिनी संजय मैंदर्गीकर यांनी आपल्या कार्यकुशलतेमुळे व शिस्तीमुळे समाजाविषयी, सामाजिक जाण असलेल्या संवेदनशीलतेमुळे त्यांनी सामाजिक क्षेत्रात विश्वासाहर्ता अधिक दृढ केली आहे. सौं. मृणालिनी मैंदर्गीकर यांनी पंचवीस एक वर्षांपूर्वी तत्कालीन विश्वकर्मा महिला भजनी मंडळाच्या अध्यक्षा सौं. कुसुमताई महामुनी यांच्या मार्गदर्शना खाली वसुंधरा महिला मंडळाची स्थापना केली. त्या विज्ञान शाखेच्या पदवीधर आहेत. त्यांचे माहेर पुणे असून ३० वर्षांपूर्वी त्यांनी सोलापूर सासर पसंत केले आजच्या मुली पुण्याचेच स्थळ पाहिजे म्हणून अडून बसतात. सौं मृणालिनी मैदर्गीकर या वसुंधरा महिला मंडळामार्फत सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रम आयोजित करतात. त्यात श्री. कालिका मंदिरात नवरात्र उत्सव, चैत्रा गौरी, मकर संक्रन्ती, अधिक महिना, गोकुळाष्टमी, कृष्ण लिलेचे सजीव देखावे, नवरात्रीत नवदुर्गेचे नऊ रूपे, जागतिक महिला दिन, महिला साठी आरोग्य शिबीर, तज्ञ् महिला डॉक्टर चे मार्गदर्शन, आरोग्य विषयक माहिती, गृह उद्योगातून महिलांनी बनवलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी स्टॉल्स लावणे, भजन कार्यक्रम आदीं कार्यक्रम राबवितात. तसेच राज्यस्तरीय वधू वर मेळावा, उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या पुरस्कार प्रदान सोहळा आदि सामाजिक कार्यात त्यांचा आणि उपाध्यक्ष सौं संध्या कळमणकर, सेक्रेटरी सौं. पल्लवी महामुनी यांचे सह सौं. मीरा महामुनी, सौं. संगीता पोतदार, सौं अरुणा तपासे, गौरी उळेकर, साधना वेदपाठक, सौं. शुभांगी महामुनी, मेधा मैंदर्गीकर, श्रीमती स्मिता पोतदार व इतर सर्व महिला सदस्यांचा सक्रिय सहभाग असतो. यातील बहुतांश सदस्य विवाह जुळविण्याचे पुण्य कार्यही करतात. मंडळामार्फत दरवर्षी धार्मिक यात्रा, हुरडा पार्टी, वन डे ट्रिप, रंगोत्सव आदि चे नियोजन करून आनंदोत्सव साजरा करतात. आता त्यांचे ध्येय अनाथाश्रम मधील मुलासाठी कार्य करण्याचे आहे. सौं. मृणालिनी मैंदर्गीकर या गेल्या पंधरा वर्षांपासून श्री. कालिका नागरी सहकारी पत संस्थेचे संचालक असून एक टर्म त्यानी व्हॉइस चेअरमन पद ही भूषविले आहेत.त्या आपली कारकीर्द यशस्वीरित्या पार पाडत आहेत.आता पर्यंत त्यांना समाज गौरव, आदर्श माता, समाज रत्न आदि पुरस्काराने गौरविण्यात आलेले आहे .त्या कडक शिस्तीच्या असल्या तरी त्यांच्या चेहऱ्या सारख्याच त्या स्वभावाने खूप गोड आहेत. त्यांचे सामाजिक, धार्मिक योगदान भरीव आहे.त्या वात्सल्याची खाण, मायेच आभाळ, कर्तृत्वाचं उंच शिखर तर आहेतच.त्यांच्या हळव्या हृदयात अनाथ मुलासाठी प्रचंड तळमळ आहे. खरा एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे साने गुरुजींच्या या मानवतेच्या संदेश देणाऱ्या ओळी त्यांनी आत्मसात केल्या आहेत.मानवता धर्म त्यांनी पाळला आहे.त्या साक्षात माणुसकीचा मूर्तिमंत उदाहरण आहेत.त्या प्रत्येक महिला, युवती यांच्या स्फूर्ती आहेत, त्या सर्वांच्या आवडत्या , जिवलग मैत्रीण,मार्गदर्शिका,तसेच प्रेरणास्रोत आहेत. खचलेल्या मनाला उभारी देणाऱ्या त्या ऊर्जास्रोत आहेत. निष्पाप,अनाथ, निराधार विध्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करून त्यांना त्यांच्या जीवनात आशेचा किरण दाखवतात . त्या उत्कृष्ट समाज सेविका आहेत.आकर्षक व्यक्तिमत्व, अफाट जिद्द,कुशाग्र बुद्धिमत्ता लाभलेल्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या त्या धनी आहेत.आपणही समाजाचे कांही देणे लागतो ही उदात भावना ठेऊन त्या प्रत्येक क्षण इतरांच्या मदतीला तत्पर असतात. सौं. मृणालिनी मैंदर्गीकर यांचा चढता आलेख पाहता ऊर अभिमानाने भरून येतो.महिला सक्षमीकरणासाठी त्या नेहमी प्रयत्नशील असतात.त्यांच्या विषयी जेवढं लिहिल तेवढं कमीच आहे.परिपूर्णतेचा ध्यास काय असतो हे त्यांच्याकडून शिकावं. नव्या उमेदीने नव्या स्वप्नांना उराशी बाळगत पुढचा प्रवास सुखदायी व्हावा आणि यापुढेही गरीब, निराधार अनाथ विध्यार्थी विध्यार्थिनीं साठी शैक्षणिक कार्य आणि समाज हिताचे कार्य घडावे हीच मंगलकामना आणि भविष्यासाठी शुभेच्छा !



**–वसंत पोतदार, सोलापूर**
**मोबाईल ९४२३०६५९१५**

# नवरात्रीत कांदा आणि लसूण खाणं पाप? प्रेमानंद महाराज

शारदीय नवरात्र उत्सवाला २२ सप्टेंबरपासून भव्य सुरुवात झाली आहे. देशभरातील श्रद्धालूंनी या नऊ दिवसांच्या महापर्वाला मोठ्या भक्तिभावाने सुरुवात केली आहे. यंदाचे नवरात्र विशेष म्हणजे ते दहा दिवसांचे आहेत. आश्विन महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या प्रतिपदा तिथीला या उत्सवाची सुरूवात झाली, तर दशमी तिथीला उपवास सोडल्यावर हा महापर्व संपेल. नवरात्रात भक्त उपवास ठेवतात, मांसाहार आणि मद्यपान टाळतात. काहीजण पूर्णपणे अनवानी आहार घेतात, तर काहीजण लसूण आणि कांदा देखील टाळतात. त्यांचा विश्वास आहे की देवीच्या आराधनेत कांदा-लसूण सेवन करणे योग्य नाही. या पवित्र काळात भक्त देवीच्या विविध रूपांची पूजा करतात, आरतीत सहभागी होतात आणि भजन-कीर्तनाद्वारे भक्तिभाव व्यक्त करतात. पण खरोखरंच नवरात्रीत लसूण आणि कांदे खाणे पाप असते का? तसेच ते खाल्ल्यानंतर देवीची सेवा करू शकत नाही का? असे प्रश्न अनेकांना पडतात. अनेकांना याबाबत संभ्रम असतात. याबद्दल प्रेमानंद महाराजांनी काय सांगितलं आहे ते जाणून घेऊयात.

लसूण-कांदा खाल्ल्यास पूजा होईल का? प्रेमानंद महाराजांनी काय सांगितलं?

श्रावण, नवरात्र आणि इतर पवित्र सणांच्या काळात लसूण आणि कांदा खाणे योग्य आहे का, हा प्रश्न एका भक्ताने संत प्रेमानंद महाराजांशी विचारला. महाराजांनी स्पष्ट केले की, संत आणि ऋषींना लसूण व कांदा खाण्यास मनाई असते. कारण त्यांचा सेवन केल्यास



तमोगुण वाढतो, ज्यामुळे जप, तप आणि ध्यान यामध्ये अडथळे निर्माण होतात. लसूण आणि कांदा खाणे पाप नाही, कारण हे बटाट्यांसारख्या इतर भाज्यांसारखेच पिकवले जातात. परंतु त्यांच्या विशेष गुणधर्मामुळे साधकांसाठी, जप-तप करणाऱ्यांसाठी आणि दीक्षा घेतलेल्या व्यक्तींसाठी ते निषिद्ध मानले जातात. महाराजांचे मार्गदर्शन भक्तांसाठी उपयुक्त आहे, जे आपल्या धार्मिक आणि साधनात्मक आचरणात संतुलन ठेवू इच्छितात. प्रेमानंद महाराज पुढे म्हणाले की, जर कोणी लसूण आणि कांदा खाल्ला असेल तरी तो देवी दुर्गाची सेवा करू शकतो, परंतु देवीला अर्पण केलेल्या नैवेद्यात लसूण आणि कांदा वापरलेला नसावा.

-क्षळीं झुरी : अतिवृष्टीने झोडपलेल्या शेतकऱ्यांना अजितदादांकडून मदतीचा मोठा दिलासा; अटसुद्धा रद्द

धाराशिव : राज्यातील अनेक भागांत सुरू असलेल्या मुसळधार पावसाने मराठवाडा आणि विदर्भ या दोन्ही भागांना मोठा फटका बसला आहे. सततच्या पावसामुळे

...आधी 'राधा-राधा' जप करा आणि मग कांदा खा

भक्तांनी विचारले की, जेव्हा शाळेतील मुले भेटीसाठी बाहेर जातात, तेव्हा त्यांना कांदा-लसूणाचं जेवण मिळतं. आम्हालाही तिथे जाण्याची इच्छा असते, पण बाहेरून जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत काय करावे? यावर प्रेमानंद महाराजांनी उत्तर दिले, उपाशी राहू नका. आधी 'राधा-राधा' जप करा आणि मग कांदा खा. कांदा देखील थोडे प्रेम निर्माण करतो. संतांनी कांदा निषिद्ध केले कारण त्याचे सेवन तमोगुण वाढवते, आणि भजन करताना सत्वगुण आवश्यक असतात. त्यामुळे कांदा खाणे पापकर्म नाही. महाराजांनी उदाहरण देत पुढे सांगितले की, सैन्यात, व्यवसायात किंवा अभ्यासात असलेल्यांना सूट आहे. साधू, महात्मा आणि ईश्वराच्या मार्गावर प्रवास करणाऱ्यांना कांदा आणि लसूण खाण्यास मनाई आहे. जरी हे दारू, मासे किंवा मांसासारखे पाप मानले जात नसले तरी, ते मूळतः तामसिक आहेत आणि भक्ती पद्धतींच्या विरुद्ध भावना निर्माण करतात. म्हणून, ते निषिद्ध मानले जातात असंही महाराजांनी म्हटलं आहे.

कांदा-लसूणवरून भांडण टाळा

प्रेमानंद महाराजांनी भक्तांना मार्गदर्शन केले की, ज्यांची इच्छा असेल त्यांनी कांदा-लसूण खावे. कौटुंबिक जीवनात अनेकदा कुटुंबातील सदस्य कांदा आणि लसूण खातात, त्यामुळे भक्तीच्या नावाखाली भांडणे करणे योग्य नाही. भांडायची गरज असेल तर स्वयंपाकघरात सर्वांसाठी एकसारखे पदार्थ बनवण्याची विनंती करा.

# पाकच्या कराराचा अर्थ

पाकिस्तान आपले सैन्य कंत्राटी पद्धतीने त्याच्या मित्र देशांना पुरवतो. सौदी अरेबियाकरता येत्या काळात पाकिस्तानी सैनिक अधिकृतरीत्या लढू शकतील! जॉर्डनमध्ये पाकिस्तानच्या कंत्राटी सेनेने झियांच्या नेतृत्वाखाली तेथील पॅलेस्टिनींचा संहार केला होता, हे ऐतिहासिक सत्य जगाला माहीत आहे.

पाकिस्तान आणि सौदी अरेबिया यांच्यात नुकताच संरक्षण करार झाला. एकावर हल्ला झाल्यास तो दोन्ही देशांवरील हल्ला मानला जाईल, असे त्यात म्हटले आहे. भारताची चिंता वाढविणार्या वेगवान घडामोडींमधील आणखी एक, या दृष्टीने त्याकडे पाहावे लागेल. सौदी अरेबियाबरोबर भारताचे घनिष्ठ संबंध आहेत, असा समज करून देण्यात आला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच सौदी अरेबियाचा दौराही केला. राजपुत्र मोहमद बिन सलमान यांच्या खास निमंत्रणावरून मोदी तेथे गेले होते. पंतप्रधानांनी त्यांचा उल्लेख 'माझे बंधू' असाही केला ! खास मित्र म्हणून त्यांनी सातत्याने ज्यांचे वर्णन केले होते त्या डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून भारत कोणता अनुभव घेत आहे, हे सर्वजण पाहात आहेत! पहलगाम हल्ल्यामुळे मोदी यांना दौरा अर्धवट सोडून परतावे लागले. पहलगाम हल्ला घडवून भारताला धक्का देणार्या पाकिस्तानबरोबर संरक्षण करार करण्याचा निर्णय सौदी अरेबियाने घेतला. हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे यश मानायचे का? या कराराबद्दल कल्पना होती, आम्ही संभाव्य परिणामांचा अभ्यास करत आहोत, अशी प्रतिक्रिया भारताच्या वतीने देण्यात आली आहे. इस्रायलने कतारवर केलेला हल्ला, हे पाकिस्तान - सौदी अरेबिया यांच्यातील कराराचे कारण सांगितले जाते. कतारमध्ये अमेरिकेचा लष्करी तळ आहे. अर्थात, कतार अमेरिकेच्या संरक्षण छायेत आहे. मात्र; इस्रायलचा हल्ला अमेरिकेला रोखता आला नाही, याची प्रतिक्रिया अरब जगामध्ये उमटली. कतारवर हल्ला करून इस्रायलने हमासच्या राजकीय नेतृत्वाला लक्ष्य केले. गाझा पट्टीत युद्धविरामाच्या अमेरिकेच्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी हमासचे नेते कतारची राजधानी दोहामध्ये जमले होते. त्यामुळे अमेरिकेला कतारवरील इस्रायलचा हल्ला रोखण्याची इच्छा नव्हती, हा अरब देशांमध्ये उमटलेला सूर वस्तुस्थितीला धरून नाही. पॅलेस्टाईनच्या प्रश्नामुळे आखातातील देश आणि इस्रायल यांच्यात विसंवाद आहे. पाकिस्तानचा 'इस्लामी बॉंब' हे तेथील अनेक देशांना स्वत:चे सामर्थ्य असल्याचे वाटते. प्रत्यक्षात, पाकिस्तानच्या आण्विक शस्त्रांचे नियंत्रण अमेरिकेकडे आहे हा भाग वेगळा! पाकिस्तान आर्थिक अरिष्टाशी झुंजत आहे. सौदी अरेबिया पाकिस्तानला कायम आर्थिक साहाय्य पुरवत



आला. आताच्या करारानुसार पाकिस्तानकडे आणखी पैसा येईल. त्यातील मोठा भाग दहशतवादी कारवायांसाठी, काही आण्विक कार्यक्रमासाठी वापरला जाईल, हे उघड आहे.

नव्या गटासाठी पावले

पाकिस्तानच्या अणु कार्यक्रमाला निधी पुरविण्याची जबाबदारी सौदी अरेबियाने पार पाडली. १९९८ मध्ये पाकिस्तानने अण-परीक्षण केले. त्यावेळी सौदी अरेबियाचे त्यावेळचे संरक्षणमंत्री पाकिस्तानात जाऊन आले. अणुभट्टीची पाहणीही त्यांनी केली. एका देशाची दुसर्या देशाला मदत कारणाशिवाय नसते. सौदी अरेबियाला आता आपल्या आर्थिक पाठिंब्यातून पाकिस्तानने तयार केलेली अण्वस्त्रे हवी आहेत. आम्ही ती देऊ, असे पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी जाहीरपणे सांगितले. हे जाहीर करून पाकिस्तानने सौदी अरेबियाला इस्रायलच्या शत्रू देशांच्या यादीत ठळकपणे आणून ठेवले. संयुक्त राष्ट्रात हमास आणि अन्य दहशतवादी संघटनांच्या बाबतीत बोलताना इस्रायलने थेट पाकिस्तानचे नाव घेत, शत्रू कोणत्याही देशात लपला तरी त्याला शोधून नष्ट करू, असे सांगितले. ते पुरेसे बोलके होते. आतापर्यंत सौदी अरेबियाच्या सैन्याच्या प्रशिक्षणाची जबाबदारी पाकिस्ताननेच पार पाडली आहे. हे सहकार्य असताना, एका देशावरील हल्ला दुसर्यावरील हल्ला मानला जाईल, या कलमाची गरज होती का? हा खरा मुद्दा! 'देशाचे अधिकृत धोरण' म्हणून पाकिस्तानकडून पोसला जाणारा दहशतवाद पाहता करारातील संबंधित कलम सौदी अरेबियाने मान्य करणे भारताला डिवचणारे आहे. इस्लामी देशांची 'नाटो'च्या धर्तीवर संघटना असावी, ही योजना मूर्त रूप घेत आहे का? त्या दिशेने टाकलेले पाऊल, असा देखील पाकिस्तान-सौदी अरेबिया यांच्यातील कराराचा अर्थ निघतो.

# उत्तम आरोग्यासाठी पोटाकडे लक्ष द्या..



पोटाचे आरोग्य उत्तम असेल तर आपलं पूर्ण शरीर निरोगी राहतं. पोटाचं आरोग्य सांभाळण्यासाठी आतड्याचे स्वच्छ राहणे, निरोगी रहाणे गरजेचे असते. आतड्याचे आरोग्य हे सर्वात महत्वाचं आहे. ते निरोगी नसेल तर अनेक आजार होतात. म्हणून यासाठी योग्य आहार घेणं गरजेचं आहे. काहीसुद्धा खाल्लं कि ऍसिडिटी होणे, पोट बाहेर येणे यासाठी अनेक गोळ्या, सप्लिमेंट घेत असाल तर त्यापेक्षा सकस आहार घेऊन आपल्या आतड्याची काळजी घेऊ शकतो. लिंबू पाणी प्या.. सकाळी उठल्यावर लिंबाचे पाणी प्यायलात तर रक्तातील क्षार वाढतील. शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत होईल तसेच पचनक्रिया सुधारेल. सकाळच्या नाश्त्यासाठी पौष्टिक आहार.. सकाळच्या नाश्त्यामध्ये तुम्ही अंड्याचा पांढरा भाग, फळे, नारळपाणी याचा समावेश करू शकता. दुपारचे जेवण म्हणजे शाकाहारी थाळी.. ज्वारी, बाजरी किंवा नाचणीच्या भाकरीसोबत पालेभाज्या, कडधान्य, ताक, काकडी, गाजर, बीटाची कोशिंबीर याचा समावेश असेल तर आरोग्य उत्तम रहाते. संध्याकाळचा नाश्ता तेलकट नसावा.. संध्याकाळ झाली कि चहा सोबत चटपटीत खायला मिळावं असं सर्वांना वाटतं. पण त्याऐवजी चणे, शेंगदाणे, कुरमुरे असं खाऊन भूक आणि तब्येत दोन्ही सांभाळू शकता. रात्रीचे जेवण हलके घ्या.. रात्रीच्या जेवणात सूप, सलाड, हिरव्या भाज्या, डाळ-भात असा साधा आहार केला तर पचायला सोपे जाते.

# चिनी शास्त्रज्ञांनी लावला हाडे जोडणाऱ्या डिंकाचा शोध



बीजिंग : चिनी शास्त्रज्ञांनी हाडे चिकटवणार्या पदार्थाचा शोध लावला आहे.हा डिंक २ ते ३ मिनिटांत तुटलेली हाडे जोडतो. तो डिंक ऑयस्टरपासून निर्मित असून, पूर्णपणे जैवविघटनशील आहे, म्हणजेच ६ महिन्यांत तो शरीरात विरघळतो. यामुळे धातूच्या इम्प्लांटची गरज भासणार नाही, असा दावा शास्त्रज्ञांनी केला आहे.

चिनी शास्त्रज्ञांनी विशेष संशोधन आणि चाचणीनंतर हा हाडांचा डिंक विकसित केला आहे. हा डिंक तुटलेल्या हाडांमध्ये घातला जातो. काही मिनिटांत तो हाडे जोडून त्यांना मजबूत पकड देतो. ही पद्धत पारंपरिक प्लास्टर किंवा शस्त्रक्रियेपेक्षा खूपच सोपी आणि वेगवान आहे.

सर्वांत खास गोष्ट म्हणजे हा डिंक हाडांमध्ये घातल्यानंतर २ ते ३ मिनिटांतच त्याचा परिणाम दिसून येतो. या जलद परिणामामुळे शस्त्रक्रियेचा वेळही कमी होईल आणि रुग्णाला लवकर आराम मिळेल. हा डिंक विशेषतः वृद्ध आणि अपघातग्रस्त रुग्णांसाठी जीवन बदलणारा ठरू शकतो.

चिनी शास्त्रज्ञांनी शोधलेला हा गोंद केवळ लहान फ्रॅक्चरमध्येच नव्हे तर अनेक मोठ्या शस्त्रक्रियांमध्ये देखील उपयुक्त ठरू शकतो.शस्त्रक्रियांदरम्यान डॉक्टरांना हाडे जोडण्यासाठी खूप वेळ लागत होता, परंतु आता ही प्रक्रिया खूप सोपी होईल. यामुळे शस्त्रक्रियांचा धोका आणि खर्च दोन्ही कमी होईल.

## वैवाहिक जीवनासाठी काही टिप्स



डॉक्टर टीप्स



वैवाहिक जीवनासाठी योग्य नाही आहे या गोष्टी - खास करून महिला, आपल्या पार्टनरसोबत सहवासाबद्दल बोलताना टाळण्याचा प्रयत्न करतात. कारण त्या यात स्वत:ला असहज जाणवतात किंवा त्यांना असे वाटत की सहवासाबद्दल बोलण्याची काहीच गरज नसते. पण हिच सर्वात मोठी चूक आहे जी तुमची सेक्स लाईफ बरबाद करू शकते. तर पाहूया त्या ७ गोष्टींकडे ज्या तुमच्या सहवास लाईफसाठी योग्य नाही आहे. **१. फोरप्ले न करणे** - भले तुमचे पूर्ण लक्ष आणि ॲनर्जी ऑर्गे जमवर असेल, पण फोरप्लेला एवढेच महत्त्व द्यायला पाहिजे. एक दूसर्यासोबत मसाज सेशनमध्ये काही

## विनोद

**घोटाळे, गैरव्यवहार बंद झाले तर एवढा खर्च करून निवडणूक कोण लढणार!**




शिक्षक : सांग बंडू, चहा लाभदायक की नुकसानकारक?
बंडू : कुणी पाजला तर लाभदायक, पाजावा लागला तर नुकसानकारक.

## संदेश

**Banta:** Name the 3 fastest means of communication.
**Santa:** Telephone, Television, Tell-a-woman

## सुविचार




**त्याग करावा पण ताठा नसावा.**

**संस्कृत सुभाषित**

**युक्तियुक्तं प्रगृह्णीयत बालादपि विचक्षणः।**
**खेरविषयं वस्तु किं न दीप: प्रकाशयेत्?।।**

**अर्थ :** एखादी योग्य गोष्ट लहान मुलाने जरी सुचविली ती तिपुणानेही ग्राह्य धरावी. जिथे सूर्यप्रकाश पोचत नाही, (ती जागा) दिव्याने प्रकाशित होत नाही का?

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. कलागत लावणारा
३. हवाई प्रवाशांचा थांबा
५. पशु, श्वपद
८. सुप्रसिद्ध
९. आवश्यक गणसंख्या
१०. झाकण्याचे पात्र
११. सद्वर्तनी
१३. हेतुपुरस्पर वेळ वाया घालविणे
१५. कडकडीत, गरम
१६. रसाळ, गोमटी फळे देणारा मसंयमफ
१७. युद्ध
१९. भूपती
२०. अंदमानलगतचे बेट
२२. अनुयायी, सेवक
२३. कर्ण
२५. एकमेकापुढे
२७. पाप
२९. चकाकी
३१. अती उंचीचे विशेषण
३२. शंकर
३३. कांद्याचे हिरवे पान
३४. शेंगेची साल
३६. चुलता
३७. आजूबाजूला, निकट
३९. एक सुगंधी उष्ण पेय
४०. कायदेशीर
४१. पसरट, उथळ वाटी
४२. चांगली
४३. अंकुर
४४. सवड
४७. कैद
४८. चाळा, छंद
४९. उणीव, बनावटपणा
५०. व्यसनी
५१. ठसा उमटविणे, एकसारख्या प्रती काढणे
५२. युक्ती
५३. पवित्र
५४. विरड्यांची डाळ
५५. अदृश्य
५६. खून, हत्या
५८. दंड व बाहू यांना जोडणारा सांधा
६०. सतत
६२. दुसऱ्याचे उपकार
६४. मनुष्य
६५. आईचा भाऊ
६७. पांढरे सुगंधी फूल
६८. कौसल्यापुत्र
६९. दृष्टीभेट
७०. अहंकार
७१. ताणल्यास तुटणारे

## उभे शब्द

१. छोटी घागर
२. अभ्यासपूर्ण भाषण
३. उगीच, नाहक
४. प्रकरण, घटना, बाब
५. सोन्याचांदीचा धागा
६. बारसे
७. किरकिर करणारा
१२. भूमीतील तीन कोनांची नावे
१४. दुसऱ्यासाठी केलेला खर्च
१८. सुसर
२०. निर्णय
२१. मदत न करणे
२४. स्वैर, नियमबाह्य
२५. संतोष
२६ मयूर
२७. सरसरीत
२८. अंदाज, अनुमान
३०. पोपट
३३. एक चर्तुथांश
३५. भेग, चीर
३६. तांबडा भोपळा
३७. लोकांचा घोळका
३८. पाण्याला करून दिलेली वाट
३९. न वापरलेला, नवा
४०. टपोरी, मवाली
४३. सांगड (ला.)
४४. गुन्हा
४५. सदोदित
४६. खर्चातील कपात
४७. महासर्प
४८. वाळवलेल हरभरा
४९. सुगरणीचे घरटे, केशरचनेचा पेशवेकालीन प्रकार
५०. नूतन
५२. नगण्य किंमत
५७. परका
५९. वारा
६१. संमती, होकार
६२. रज:कण
६३. इच्छा
६४. फक्त, केवळ
६५. भडीमार
६६. प्रतिष्ठा, अब्रू

## आडवे उत्तर

१.कळलाव्या ३.विमानतळ ५.जनावर ८.ख्यातनाम ९.कोरम १०.डबा ११.शीलवान १३.कालपव्यय १५.कढत १६.धीर १७.समर १९.राजा २०.निकोबार २२.गण २३.कान २५.समोरासमोर २७.पातक २९.लकाकी ३१.ताडमाड ३२.हर ३३.पात ३४.टरफल ३६.काका ३७.जवळपास ३९.कोको ४०.सनदशीर ४१.रानटी ४३.मोड ४४.अवसर ४७.अटक ४८.चळ ४९.खोट ५०.नशाबाज ५१.छापणे ५२.करामत ५३.पाक ५४.वाल ५५.गडप ५६.वध ५८.कोपर ६०.हरघडी ६२.परोपकार ६४.मानव ६५.मामा ६७.मोगरा ६८.राम ६९.नजरानजर ७०.गर्व ७१.नाते

## उभे उत्तर

१.कळशी २.व्याख्यान ३.विनाकारण ४.मामला ५.जर ६.नामकरण ७.रडतराऊत १२.लघुकोन काटकोन विशालकोन १४.पदरमोड १८.मगर २०.निकाल २१.असहकार २४.बेताल २५.समाधान २६.मोर २७.पातळसर २८.कयास ३०.कीर ३३.पाव ३५.फट ३६.काशी यात्रा ३७.जमाव ३८.पाट ३९.कोरा ४०.सडकछाप ४३.मोट ४४.अपराध ४५.सतत ४६.काटकसर ४७.अजगर ४८.चणे ४९.खोपा ५०.नवा ५२.कवडीमोल ५७.उपरा ५९.पवन ६१.रकार ६२.पराग ६३.कामना ६४.मत्र ६५.मारा ६६.मान



# क्रीडा विश्व





इटलीतील नेपल्स येथे सेरी ए फुटबॉल सामन्यात स्पर्धा करताना नेपोली आणि पिसाचे खेळाडू.

# भारताने बांग्लादेशला चारली पराभवाची धूळ

## अभिषेकचे धावांचे वादळ आणि भारताच्या गोलंदाजांचा मारा

दुबई: आशिया कप २०२५मधील सुपर ४च्या सामन्यात भारताने बांगलादेशला पराभवाची धूळ चारली. या सामन्यात भारतीय संघाने बांगलादेशसमोर विजयासाठी १६९ धावांचे आव्हान ठेवले होते. मात्र भारताच्या माऱ्यासमोर बांगलादेशचे शेर ढेर झाले आणि त्यांचा ४१ धावांनी पराभव झाला. बांगलादेशचा संपूर्ण संघ १२९ धावांत गारद झाला.

भारताने विजयासाठी दिलेल्या १६९ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या बांगलादेशची सुरूवात खराब झाली. ४ धावांवर त्यांचा पहिला बळी गेला. सलामीवीर सैफ हसन याने एकट्याने ६९ धावांची सर्वाधिक खेळी केली. तर परवेझने २१ धावा केल्या. बांगलादेशचे इतर सर्व फलंदाज दुहेरी धावाही करू शकले नाहीत. कुलदीप यादवने ३ बळी घेतले तर जसप्रीत बुमराह आणि वरूण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी दोन बळी मिळवले. पहिल्यांदा फलंदाजीस उतरलेल्या भारतीय संघाने संथ सुरूवात केली. पहिल्या षटकांत गिल-अभिषेकने केवळ ३ धावा केल्या. यानंतर बांग्लादेश गोलंदाजांसमोर अभिषेक-गिल सावध फलंदाजी करताना दिसले. मात्र चौथ्या षटकापासून गिलने चौकार-षटकारांचा पाऊस करण्यास सुरूवात केली. अभिषेकही लयीत दिसला. ५व्या षटकांत भारताची धावसंख्या ५५-० अशी होती. मात्र ७व्या षटकांत गिलच्या



रूपात भारताला पहिला झटका बसला. त्याने २९ धावा केल्या. त्यानंतर आलेला शिवम दुबेही पटकन बाद झाला. त्याला केवळ २ धावा करता आल्या. त्यानंतर अभिषेक शर्माने आपले अर्धशतक पूर्ण केले. यानंतर भारताने आपले शतकही पूर्ण केले. १२व्या षटकांत भारताला तिसरा झटका बसला. अभिषेक शर्मा ३७ बॉलमध्ये ७५ धावा करून बाद झाला. याच षटकांत सूर्यकुमार यादवनेही आपली विकेट गमावली. त्यानंतर तिलक वर्माही स्वस्तात बाद झाला. त्याने केवळ ५ धावा केल्या. मात्र हार्दिक आणि अक्षर यांच्यात चांगली भागीदारी झाली. दोघांनी भारताची धावसंख्या १६८ पर्यंत पोहोचवली.आकडेवारीनुसार, हा सामना एकतर्फी होण्याची अपेक्षा आहे. कारण बांगलादेशने दोन्ही संघांमधील १७ टी-२० सामन्यांपैकी फक्त एकच सामना जिंकला आहे. शेख हसीना सरकारच्या पतनानंतर भारताचे बांगलादेशशी राजनैतिक संबंध देखील ताणले गेले आहेत. लोकशाही पद्धतीने निवडून आलेले सरकार सत्तेत राहिल्यास, बीसीसीआयने या वर्षी ऑगस्टमध्ये बांगलादेशमध्ये होणारी मालिका २०२६ पर्यंत पुढे ढकलली होती. कागदावर भातीयय संघ अधिक मजबूत आहे. पण बांग्लादेशला कमी लेखण्याची चूक भारतीय संघ करणार नाही. सूर्यकुमार यादवचा संघ आणखी एका विजयासाठी प्रबळ दावेदार आहे. पण टी-२० क्रिकेटमध्ये काहीही भाकित करता येत नाही आणि बांगलादेशचे फिरकीपटू दमदार कामगिरीने भारताला धक्का देण्यास सज्ज आहेत.भारताचे प्लेइंग इलेवनः अभिषेक शर्मा, शुभमन गिल, सूर्यकुमार यादव (कर्णधार), तिलक वर्मा, संजू सैमसन (विकेट कीपर), शिवम दुबे, हार्दिक पंड्या, अक्षर पटेल, कुलदीप यादव, वरूण चक्रवर्ती आणि अर्शदीप सिंह. बांगलादेश (प्लेइंग इलेवन): सैफ हसन, तंजीद हसन तमीम, परवेज हुसैन इमोन, तौहीद हृदोय, शमीम हुसैन, जेकर अली (विकेटकीपर/ कर्णधार), मोहम्मद सैफुद्दीन, रिशाद हुसैन, तंजीम हसन साकिब, नसुम अहमद, मुस्तफिजुर रहमान

## थोडक्यात/ संक्षिप्त

### संजू सॅमसनने घेतलेली कॅच बघताच. अंपायर अनिल चौधरींच्या विधानाची चर्चा

मुंबई -आशिया चषक स्पर्धेत २१ सप्टेंबर रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यात सुपर-४ चा सामना खेळवण्यात आला. या सामन्यातील फखर झमानच्या कॅचबाबत पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आयसीसीकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे. टीव्ही अंपायर रुचिरा पल्लियागुरुगे यांनी चुकीच्या पद्धतीने फखर झमानला बाद घोषित केले. फखर झमान बाद नव्हता, असा दावा पाकिस्तान क्रिकेट बोर्डाकडून करण्यात आला आहे. या सगळ्या प्रकरणावर माजी पंच अनिल चौधरी यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

क्रिकेटमध्ये ही जुनी परंपरा आहे. मी कोणत्याही विशिष्ट संघाचा उल्लेख करत नाहीये, पण एक संघ १०० धावांनी हरतो आणि नंतर म्हणतो की, पंचाने चुकीचा वाईड दिला. दुसरा अँगल पाहता आला असता. परंतु प्रत्येक पंचाची समाधानी राहण्याची स्वत:ची पद्धत असते आणि रुचिरा पल्लियागुरुगे देखील संजू सॅमसनच्या झेलबाबत समाधानी होते. चेंडू जमिनीला स्पर्श केल्याचा कोणताही स्पष्ट पुरावा नव्हता. मीही संजू सॅमसनचा झेल एकदा पाहिल्यानंतर फखर झमान बाद असल्याचे स्पष्ट झाले.हार्दिक पांड्याच्या षटकातील तिसरा चेंडू फखरच्या बॅटच्या कडेला लागला. या व्हिडीओमध्ये संजू सॅमसनने योग्य झेल घेतल्याचे दिसून येतेय.

***

### त्रिशतक मारणाऱ्या फलंदाजाला संघात स्थान मिळणार?

नवी दिल्ली -शुभमन गिलच्या कसोटी कर्णधारपदाच्या कारकिर्दीची सुरुवात इंग्लंडमधील २-२ अशा बरोबरीमुळे काहीशी सकारात्मक झाली. आता, त्याच्यासमोर पूर्णपणे वेगळ्या, पण तितक्याच कठीण आव्हानाचा सामना आहे. भारतीय क्रिकेट संघ वेस्ट इंडिजचं यजमानपद भूषवण्यास सज्ज आहे. दोन्ही संघांदरम्यान दोन सामन्यांची कसोटी मालिका २ ऑक्टोबर रोजी अहमदाबाद आणि नवी दिल्ली इथं सुरु होत आहे. निवड समिती या मालिकेसाठी संघ जाहीर करणार आहे. इंग्लंड दौऱ्यासाठी परतलेल्या करुण नायरला संधी मिळेल का याकडे सर्वांचं लक्ष असेल.

घरच्या मैदानावर वर्षातील पहिलीच मालिका : २०२५-२७ च्या नवीन जागतिक कसोटी अजिंक्यपद चक्रातील ही भारताची दुसरी मालिका असेल. यजमान सध्या क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर आ-हेत आणि सहाव्या स्थानावर असलेल्या वेस्ट इंडिजविरुद्ध चांगली मालिका (तीन कसोटींमध्ये एकही विजय नाही) त्यांना अव्वल दोनमध्ये स्थान मिळवण्यास मदत करु शकते. विशेष म्हणजे न्यूझीलंडविरुद्धच्या घरच्या मैदानावर ३-० अशा पराभवानंतर भारताची ही पहिली मालिका आहे.

***

### टी-२० रँकिंगमध्ये अभिषेक शर्माचा दबदबा कायम! शुबमन गिलनेही घेतली मोठी झेप

दिल्ली-आशिया चषक २०२५ स्पर्धेत भारतीय फलंदाज आणि गोलंदाजांचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने स्पर्धेतील सुरुवातीच्या चारही सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे. भारताकडून डावाची सुरुवात करताना अभिषेक शर्मा आणि शुबमन गिल यांनी दमदार सुरुवात करून दिली आहे. दोघांनाही या कामगिरीची फायदा आयसीसी रँकिंगमध्ये झाला आहे. अभिषेक शर्मा अव्वल स्थानी कायम आहे. तर शुबमन गिलने देखील आयसीसी फलंदाजांच्या यादीत मोठी झेप घेतली आहे.

अभिषेक शर्मा अव्वल स्थानी कायम

आशिया चषक सुपर ४ फेरीतील दुसऱ्या सामन्यात भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात धावांचा पाठलाग करताना अभिषेक शर्मा आणि शुबमन गिल या जोडीने पाकिस्तानच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. अभिषेकने अर्धशतकी खेळी केली. तर गिल देखील अर्धशतकाच्या जवळ पोहोचला होता. आयसीसी टी-२० फलंदाजांच्या यादीत अभिषेक शर्मा ९०७ रेटिंग पॉईंट्ससह अव्वल स्थानी कायम आहे.

## टीम इंडियाला मोठा झटका, संघ जाहीर करण्याआधीच स्टार खेळाडूला दुखापत

दिल्ली-टीम इंडियाला मोठा झटका बसला आहे. कारण टीम इंडियाचा स्टार खेळाडू दुखापतग्रस्त झाला आहे. वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी आज खेळाडूंची निवड होणार आहे. या निवडीआधी टीम इंडियाच्या स्टार खेळाडूला दुखापत झाली आहे.ही दुखापत पाहता त्याची निवड केली न जाण्याची शक्यता आहे.

खरं तर टीम इंडिया आशिया कपनंतर वेस्ट इंडिज सोबत दोन सामन्यांची टेस्ट मालिका खेळणार आहे. या मालिकेसाठी आज भारतीय संघाची घोषणा होणार आहे. या घोषणेआधीच टीम इंडियाला मोठा झटका बसला आहे. कारण टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णा दुखापतग्रस्त झाला आहे.लखनौ येथे भारत अ आणि ऑस्ट्रेलिया अ यांच्यात दुसरा अनधिकृत कसोटी सामना सूरू आहे.

या सामन्यात वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णाच्या हेल्मेटला बॉल लागला होता. त्यानंतर त्याने मैदान सोडले होते.डावाच्या ३९ व्या षटकात ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज हेन्री थॉर्नटनचा चेंडू प्रसिद्धच्या हेल्मेटवर लागला आणि नियमानुसार, संघाच्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी ताबडतोब त्याची मानसिक कंकशन चाचणी केली.पण गोलंदाजाने चाचणीनंतर फलंदाजी सुरू ठेवली परंतु अवघ्या तीन षटकांनंतर तो मैदानाबाहेर गेला आणि त्याने बी साई सुदर्शनसोबत आठव्या विकेटसाठी केलेली शानदार भागीदारी मोडली. यावेळी विदर्भाचा वेगवान गोलंदाज यश ठाकूर प्रसिद्धच्या जागी कन्कशनसाठी आला. वैद्यकीय पथकाने अद्याप प्रसिद्धच्या दुखापतीची तीव्रता उघड केलेली नाही.

परंतु त्याच्या उपलब्धतेवर बारकाईने लक्ष ठेवले जाईल. भारताचे निवडकर्ते बुधवारी वेस्ट इंडिजविरुद्धच्या आगामी दोन सामन्यांच्या घरच्या मालिकेसाठी कसोटी संघाची घोषणा करणार आहेत.प्रसिद्ध हा जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज आणि आकाश दीप यांच्यासोबत स्पर्धेत आहे.

ज्यांनी इंग्लंडमध्ये अलिकडेच झालेल्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत वेगवान गोलंदाजीची भूमिका बजावली होती.इंग्लंडचा तो दौरा प्रसिद्धच्या रेड-बॉल कारकिर्दीतील एक महत्त्वाचा टप्पा होता. त्याने तीन सामन्यांमध्ये ३७.०७ च्या सरासरीने १४ बळी घेतले.

ज्यामुळे तो टॉप-ऑर्डर फलंदाजांना त्रास देऊ शकणारा हिट-द-डेक गोलंदाज म्हणून आशादायक कामगिरी करत होता.दुसऱ्या टेस्ट सामन्यात ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना ४२० धावा ठोकल्या होत्या. त्यानंतर भारत पहिल्या डावात सपशेल अपयशी ठरली होती. कारण भारताचा डाव १९४ धावांवर ऑल आऊट झाला होता. त्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावाला सुरूवात केली आहे. ऑस्ट्रेलियाच्या १६ धावांवर तीन विकेट पडल्या आहेत.

## अभिषेक शर्माचे वादळी अर्धशतक, भारताची धावसंख्या शंभरपार



दुबई-आशिया कप २०२५मध्ये सुपर ४ मध्ये आज टीम इंडियाचा सामना बांगलादेशशी होत आहे. बांगलादेशने टॉस जिंकत भारताला फलंदाजीचे निमंत्रण दिलेय. बांगलादेशचा लिटन दास या सामन्यात खेळत नाही आहे. भारतीय संघ कोणत्याही बदलाशिवाय खेळत आहे. भारताने हा सामना जिंकल्यास त्यांचे फायनलमधील स्थान निश्चित होईल.पहिल्यांदा फलंदाजीस उतरलेल्या भारतीय संघाने संथ सुरूवात केली. पहिल्या षटकांत गिल-अभिषेकने केवळ ३ धावा केल्या. यानंतर बांग्लादेश गोलंदाजांसमोर अभिषेक-गिल सावध फलंदाजी करताना दिसले. मात्र चौथ्या षटकापासून गिलने चौकार-षटकारांचा पाऊस करण्यास सुरूवात केली. अभिषेकही लयीत दिसला. ५व्या षटकांत भारताची धावसंख्या ५५-० अशी होती. मात्र ७व्या षटकांत गिलच्या रूपात भारताला पहिला झटका बसला. त्याने २९ धावा केल्या. त्यानंतर आलेला शिवम दुबेही पटकन बाद झाला. त्याला केवळ २ धावा करता आल्या. त्यानंतर अभिषेक शर्माने आपले अर्धशतक पूर्ण केले. यानंतर भारताने आपले शतकही पूर्ण केले.आकडेवारीनुसार, हा सामना एकतर्फी होण्याची अपेक्षा आहे. कारण बांगलादेशने दोन्ही संघांमधील १७ टी-२० सामन्यांपैकी फक्त एकच सामना जिंकला आहे. शेख हसीना सरकारच्या पतनानंतर भारताचे बांगलादेशशी राजनैतिक संबंध देखील ताणले गेले आहेत. लोकशाही पद्धतीने निवडून आलेले सरकार सत्तेत राहिल्यास, बीसीसीआयने या वर्षी ऑगस्टमध्ये बांगलादेशमध्ये होणारी मालिका २०२६ पर्यंत पुढे ढकलली होती. कागदावर भातीयय संघ अधिक मजबूत आहे. पण बांग्लादेशला कमी लेखण्याची चूक भारतीय संघ करणार नाही. सूर्यकुमार यादवचा संघ आणखी एका विजयासाठी प्रबळ दावेदार आहे. पण टी-२० क्रिकेटमध्ये काहीही भाकित करता येत नाही आणि बांगलादेशचे फिरकीपटू दमदार कामगिरीने भारताला धक्का देण्यास सज्ज आहेत.

भारताचे प्लेइंग इलेवन: अभिषेक शर्मा, शुभमन गिल, सूर्यकुमार यादव (कर्णधार), तिलक वर्मा, संजू सैमसन (विकेट कीपर), शिवम दुबे, हार्दिक पंड्या, अक्षर पटेल, कुलदीप यादव, वरूण चक्रवर्ती आणि अर्शदीप सिंह. बांगलादेश (प्लेइंग इलेवन): सैफ हसन, तंजीद हसन तमीम, परवेज हुसैन इमोन, तौहीद हृदोय, शमीम हुसैन, जेकर अली (विकेटकीपरकर्णधार), मोहम्मद सैफुद्दीन, रिशाद हुसैन, तंजीम हसन साकिब, नसुम अहमद, मुस्तफिजुर रहमान

## बांगलादेशने टॉस जिंकला! संघात तब्बल ४ बदल




दुबई-भारत विरुद्ध बांगलादेश यांच्यात आशिया कप २०२५ मध्ये सुपर ४ स्टेजचा सामना खेळवला जात आहे. यापूर्वी टीम इंडिया आणि बांगलादेश दोघांनी सुपर ४ मधील प्रत्येकी १ सामना जिंकला आहे. या सामन्यापूर्वी झालेला टॉस बांगलादेशने जिंकला. दुबईच्या आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर हा सामना खेळवला जात असून आजच्या सामन्यात विजयी होणारा संघ आशिया कप फायनलमध्ये आपलं स्थान निश्चित करेल.

भारत विरुद्ध बांगलादेश यांच्यात सुपर ४ स्टेजचा सामना खेळवला जात आहे. या सामन्याचा टॉस बांगलादेशने जिंकला. बांगलादेशचा कर्णधार लिटन दास हा दुखापतीच्या कारणामुळे हा सामना खेळणार नाही. त्याला सरावादरम्यान दुखापत झाली होती त्यामुळे त्याच्या ऐवजी जाकीर अली हा या सामन्यात बांगलादेशचं नेतृत्व करेल. . बांगलादेशने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. त्यामुळे भारताला आधी फलंदाजीसाठी मैदानात यावे लागेल.

टीम इंडियाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने बांगलादेश विरुद्धच्या सामन्यात टीम इंडियात कोणतेही बदल केलेले नाहीत. तर बांगलादेशचा काळजीवाहू कर्णधार जाकीर अलीने सांगितलं की त्यांनी मागच्या सामन्याच्या तुलनेत प्लेईंग ११ मध्ये ४ बदल केले आहेत. लिटन दास, महेदी हसन, तस्किन अहमद, शोरीफुल इस्लाम, यांना बेंचवर बसवण्यात आलं आहे.

भारताची प्लेईंग ११ : अभिषेक शर्मा, शुभमन गिल, सूर्यकुमार यादव (कर्णधार), तिलक वर्मा, संजू सॅमसन (विकेटकिपर), शिवम दुबे, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्तीबांगलादेशची प्लेईंग ११ : सैफ हसन, तन्झिद हसन तमीम, परवेझ हुसैन इमॉन, तौहीद ह्रदोय, शमीम हुसैन, जाकेर अली (कर्णधार विकेटकिपर), मोहम्मद सैफद्दीन, रिशाद हुसेन, तनझिम हसन साकिब, नसुम अहमद, मुस्तफिजुर रहमान

# सूर्याची 'ती' चूक अभिषेकला महागात पडली! शतक झळकावण्याची संधी असताना...



दुबई-आशिया चषकातील सुपर ४ फेरीतील लढतीत भारत आणि बांगलादेश हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना भारतीय संघाने १६८ धावा केल्या. या धावांचा बचाव करताना भारतीय संघाने ४१ धावांनी विजय मिळवला. अभिषेक शर्मा आणि शुबमन गिल या दोघांनी मिळून या डावातही भारतीय संघाला चांगली सुरूवात करून दिली होती. गेल्या सामन्यात अर्धशतक झळकावणाऱ्या अभिषेक शर्माने या सामन्यातही अर्धशतकी खेळी केली. त्याच्याकडे शतक झळकावण्याची संधी होती. पण सूर्यकुमार यादवच्या एका चुकीमुळे त्याला धावबाद होऊन माघारी परतावं लागलं. ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.या सामन्यात फलंदाजी करत असताना अभिषेक शर्मा १२ व्या षटकात धावबाद होऊन माघारी परतला. त्यावेळी सूर्यकुमार यादव स्ट्राईकवर होता. तर डावखुऱ्या हाताचा गोलंदाज मुस्तफिजुर रहमान गोलंदाजी करत होता. सूर्याने कट शॉट मारला, जो वेगाने जात होता. त्यावेळी पॉईटला क्षेत्ररक्षण करत असलेल्या रिशाद हुसेनने एक नंबर क्षेत्ररक्षण करत हा वेगाने जात असलेला चेंडू अडवला. नॉन स्ट्राईकला फलंदाजी करत असलेला अभिषेक शर्मा अर्ध्या क्रिझपर्यंत आला होता. बांगलादेशच्या खेळाडूने चेंडू अडवला आहे, हे त्याला खूप उशिराने कळालं. त्यामुळे त्याला मागे जाता आलं नाही. सूर्या क्रिझमध्ये परतला. पण अभिषेक शर्मा क्रिझमध्ये पोहोचणार इतक्यात रिशादने वेगाने थ्रो केला आणि त्याला धावबाद केलं. यासह तो ७५ धावा करत माघारी परतला.या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. भारतीय संघाकडून डावाची सुरूवात करण्यासाठी आलेल्या अभिषेक शर्मा आणि शुबमन गिल यांनी मिळून ७७ धावांची भागीदारी केली. अभिषेक शर्माने ६ चौकार आणि ५ षटकारांच्या साहाय्याने ७५ धावांची खेळी केली. तर शुबमन गिलने २९ धावा केल्या. ही जोडी फुटल्यानंतर शिवम दुबे अवघ्या २ धावा करत माघारी परतला. तर कर्णधार सूर्यकुमार यादवने ५ धावा केल्या. शेवटी हार्दिक पंड्याने ३८ धावांची खेळी केली. तर अक्षर पटेलने १० धावा करत संघाची धावसंख्या ६ गडी बाद १६८ धावांवर पोहोचवली.

## चन्नबस्वेश्वर महाविद्यालयात स्वच्छता अभियान व रॅली



**लातूर/प्रतिनिधी :** चन्नबस्वेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथे राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे औचित्य साधून 'स्वच्छता ही सेवा' या केंद्र सरकारच्या विशेष उपक्रमांतर्गत रॅली व स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, जबाबदारी व स्वच्छतेविषयी जागरुकता निर्माण व्हावी या उद्देशाने महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागातर्फे हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी यांच्या हस्ते करण्यात आली. त्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात राष्ट्रीय सेवा योजनेच्या महत्त्वावर प्रकाश टाकला व स्वच्छता ही केवळ एक दिवशी साजरी होणारी गोष्ट नसून, ती जीवनशैलीचा भाग व्हावा, असे आवाहन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत असे उपक्रम अधिक प्रभावीपणे राबवण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमात रा.से.यो. कर्यक्रमाधिकारी प्रा. भीमाशंकर हूच्चे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता रॅली काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी ''स्वच्छ भारत – सुंदर भारत'', ''एक पाऊल स्वच्छतेकडे'', ''प्लास्टिक मुक्त भारत'', ''मी ठेवीन माझं गाव स्वच्छ'' अशा घोषणा देत महाविद्यालय परिसरात जनजागृती केली. रॅलीत विद्यार्थ्यांनी हातात फलक, बॅनर घेऊन परिसरात स्वच्छतेचा संदेश दिला.

रॅलीनंतर महाविद्यालयाच्या परिसरात, तसेच आजूबाजूच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. विद्यार्थ्यांनी रस्त्यांवरील कचरा उचलणे, प्लास्टिक कचऱ्याचे वेगळे वर्गीकरण करणे, झाडांची निगा राखणे आणि परिसरातील घाणीचे ठिकाण स्वच्छ करणे अशा विविध उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. शिवराज नागोबा, डॉ. अनंत देशपांडे, डॉ. विवेक पंचभाई, डॉ. पद्मजा गिराम, डॉ. राम साखरे, डॉ. सुनिल हिंडोळे, प्रा. सारिका झिंगाडे, प्रा. रिशा वाले, प्रा. महेश मानके, प्रा. अविनाश मठपती, प्रा. भीमाशंकर हूच्चे, प्रा. प्रतिभा ठावरे, प्रा. प्रियंका तेलंग, प्रा. प्रशांत बनसोडे, प्रा. रोहित कोंबडे, प्रा. वसिम काझी, प्रा. शीतल हुमनाबादे, प्रा. रचिता मालशेट्टे, श्री. शिवहार विभूते, श्री. उमाकांत गचाटे, श्री. विजयकुमार उपासे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, व विद्यार्थी उपस्थित होते.

## खाजगी अभियांत्यामार्फत देणार बांधकाम परवाना

**लातूर/प्रतिनिधी :** :लातूर शहर महानगरपालिका हद्दीमध्ये खाजगी अभियंत्यामार्फत भूखंडावर बांधकाम परवाना देण्याची तरतूद करण्यात आली आहे.मंगळवारी (दि. २३) मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.यावेळी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, सहाय्यक संचालक नगर रचना अनिकेत महाजन,क्रेडाइचे अध्यक्ष उदय पाटील यांच्यासह मनपा येथे नोंदणीकृत असणाऱ्या अभियंत्यांची उपस्थिती होती.

लो रिस्क अंतर्गत अर्जदारांना जी+२ बांधकाम परवाना खाजगी अभियंत्यामार्फत देता येईल. १५० स्केअर मीटरच्या मर्यादेत हा परवाना असेल. मंजूर एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० अंतर्गत ही परवानगी असणार आहे. अनधिकृत कामे टाळण्यासाठी तसेच या संदर्भात भविष्यात तक्रार आली किंवा अनधिकृत बांधकाम केले तर संबंधित खाजगी अभियंता व अर्जदाराचे व्यावसायिक परवाने रद्द करून कायदेशीर कारवाई करण्याची तरतूदही यात आहे.

या बैठकीत गुंठेवारी संदर्भातही चर्चा झाली. गुंठेवारी नियमित सुरू करण्यात यावी असा प्रस्ताव खाजगी अभियंत्यामार्फत देण्यात आला.गुंठेवारी नियमितीकरण अंतर्गत भूखंड व बांधकाम हे नियमित करण्याचे प्रस्ताव मांडण्यात आले आहेत.त्या अनुषंगाने भूखंड व बांधकाम २०२० च्या अगोदर झालेले असणे आवश्यक आहे. अधिक बांधकाम असणाऱ्या प्रस्तावामध्ये गुंठेवारी अधिनियम २००१ च्या अनुषंगाने शुल्क आकारणी करण्यात येणार आहे.

# मध्य रेल्वेने क्रीडा, संस्कृती आणि मुख्य रेल्वे कार्यक्षेत्रात उल्लेखनीय यश

**मुंबई/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेने क्रीडा व संस्कृती क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करताना, तसेच मूळ रेल्वे निकषांमध्ये सर्वोच्च कामगिरीची परंपरा कायम ठेवत पुन्हा एकदा आपल्या सर्वांगीण उत्कृष्टतेचे दर्शन घडवले.

या बहुआयामी उत्कृष्टतेला एकाच वेळी तीन प्रतिष्ठित पुरस्कारांनी मान्यता मिळाली आहे,एकूण कार्यक्षमतासाठी पं. गोविंद बल्लभ पंत ढाल, क्रीडा क्षेत्रातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विभागासाठी कौल गोल्ड कप आणि नुकतेच प्राप्त झालेले आंतर-रेल्वे सांस्कृतिक स्पर्धा ढाल. या सर्व क्षेत्रांत उत्तुंग यश संपादन करून मध्य रेल्वेने जुने अडथळे दूर करत काटेकोर नियोजन, प्रतिभाविकास आणि अंमलबजावणीमुळे विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी साधता येते हे दाखवून दिले आहे. सातत्यपूर्ण आणि उल्लेखनीय कामगिरीमुळे मध्य रेल्वेने वेळोवेळी आपली ताकद, चिकाटी आणि लवचिकता यांचे उत्तम उदाहरण प्रस्थापित केले.

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री धर्म वीर मीना यांनी, भारतीय रेल्वे सांस्कृतिक स्पर्धा ढाल, एकूण कार्यक्षमतेसाठी पं. गोविंद बल्लभ पंत ढाल आणि क्रीडा क्षेत्रातील सर्वोत्तम कामगिरीसाठी कौल गोल्ड कप या तिन्ही पुरस्कारांचे






अभिमानाने प्रदर्शन केले.

सर्व क्षेत्रिय रेल्वेंमध्ये समग्र कार्यक्षमतेसाठी देण्यात येणारी पंडित गोविंद बल्लभ पंत ढाल (नॉर्थ- ईस्टर्न रेल्वेसह संयुक्तरीत्या) श्री धर्म वीर मीना यांनी २१ डिसेंबर २०२४ रोजी नवी दिल्ली येथील भारत मंडपम येथे स्वीकारला. या पुरस्काराद्वारे मध्य रेल्वेने वाहतूक संचालन, बांधकाम आणि इतर मूलभूत क्षेत्रांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेण्यात आली.

अनेक क्रीडा प्रकारांतील कामगिरीची दखल घेऊन सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या क्षेत्रीय रेल्वेला प्रदान करण्यात येणाऱ्या कौल गोल्ड कप मध्ये मध्य रेल्वेने आपल्या क्रीडापटूंच्या आघाडीच्या कामगिरीच्या बळावर मिळवला असून, सर्व विभागीय रेल्वे व उत्पादन युनिट्समध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे.

एकूण उत्कृष्ट कामगिरी व्यतिरिक्त, मध्य रेल्वेने प्रथमच वैयक्तिकरित्या आयआरसीसी रनिंग कल्चरल कॉम्पिटिशन शिल्ड जिंकले आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्ये आयोजित केलेल्या आंतर रेल्वे सांस्कृतिक स्पर्धे चा समग्र विजेता म्हणून उदयास आला. हा ऐतिहासिक विजय मध्य रेल्वे सांस्कृतिक अकादमीतील सर्व क्षेत्र आणि कार्यशाळांमधील कलाकारांच्या उत्कृष्ट प्रतिभेवर प्रकाश टाकतो, ज्यांनी विविध कार्यक्रमांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आणि मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री धर्म वीर मीना आणि प्रधान मुख्य वाणिज्य व्यवस्थापक श्री अरविंद मालखेडे यांच्या नेतृत्वाखालील अधिकाऱ्यांनी त्यांचे सातत्यपूर्ण पालनपोषण आणि प्रोत्साहन दिले.

पंडित गोविंद वल्लभ पंत शिल्ड, कौल गोल्ड कप आणि आंतर रेल्वे सांस्कृतिक स्पर्धा शिल्ड या तिन्ही प्रतिष्ठित ट्रॉफी एकाच वेळी मिळाल्याने, मध्य रेल्वे सर्वांगीण उत्कृष्टतेचे खरे प्रतीक म्हणून उभी आहे. ही उल्लेखनीय कामगिरी केवळ ऑपरेशनल कार्यक्षमताच नाही तर क्रीडा आणि संस्कृतीतील प्रतिभेला जोपासण्यासाठीच्या समर्पणाचे देखील प्रतिबिंबित करते, भारतीय रेल्वेचा ध्वजवाहक म्हणून मध्य रेल्वेची भूमिका बळकट करते, तिची ताकद, लवचिकता आणि प्रत्येक क्षेत्रात उत्कृष्टतेसाठी अटळ वचनबद्धता दर्शवते.

## राष्ट्रीय सेवा योजनेतून तरुणांमध्ये राष्ट्रभावना जागृत होते – प्रा. डॉ. मल्लिकार्जून करजगी




बाभळगाव : '' महाविद्यालयीन जीवन म्हणजे प्रत्येक तरुणांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असतो. येथेच विद्यार्थ्यांच्या आयुष्याला आकार भेटत असतो. राष्ट्रीय सेवा योजना ही समाजामध्ये शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जनजागृती निर्माण करण्यासाठी कार्यरत असते. स्वयंसेवकांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाजभान निर्माण होते. समाजातील विधायक व निर्मितीक्षम कार्यात स्वतःला हा स्वयंसेवक झोकून देतो. त्यामुळे तरुणांमध्ये राष्ट्रभावना जागृत होते,'' असे प्रतिपादन श्रीमती सुशीलादेवी महिला महाविद्यालय, लातूर येथील इंग्रजी विभाग प्रमुख, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील राष्ट्रीय सेवा योजना माजी संचालक प्रा. डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांनी केले.

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.करजगी बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते. यावेळी बोलताना ते म्हणाले, '' देशातील सर्वात मोठे तरुणांचे एकमेव संघटन म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना. यातूनच समाजाला कुशल आणि सक्षम नेतृत्व लाभण्याची शक्यता असते. जे विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर करतील त्यांना आपल्या स्वतःची ओळख पटते. तरुणांनी '' मी नाही पण तू '' या ब्रीदवाक्य प्रमाणे स्वतःचे व्यक्तिमत्व समाजामध्ये अधोरेखित करावे.'' कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. सुरेशकुमार कांबळे यांनी केले. यावेळी सहकार्यक्रमाधिकारी प्रा. चंद्रकांत मोरे, डॉ. दशरथ भिसे, डॉ. शाहूराज मुळे, डॉ. जयदेवी पवार, डॉ. वैशाली माढेकर, प्रा. शितल खोत, डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ. अजित भांजी, डॉ. अंगद कोते, डॉ. कांतराव पोले, डॉ.पांडुरंग मुंढे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋषिकेश सुरवसे यांनी केले तर आभार कृष्णा धामणगावे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल मध्ये सुरजकुवर देवी लाहोटी यांचा स्मृतीदिन साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल च्या वतीने सुरजकुवर देवी लाहोटी यांचा स्मुर्ती दिन साजरा करण्यात आला. प्राचार्य कर्नल श्रीनुवासुलू यांच्या हस्ते सुरजकुवर देवी लाहोटी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रस्तुत प्रसंगी कार्यक्रमात प्राचार्य कॅर्नल श्रीनिवासुलू यांनी सुरजकुवर देवी लाहोटी यांचा जीवन परिचय सांगितला गरिबासाठी देशभक्ती , मानवता आणि प्रतिष्ठेने प्रेरित होऊन गरिबासाठी श्रीमती सूरजकुंवरदेवी लाहोटी, ज्यांना प्रेमाने रानीसाबाद म्हणून ओळखले जाते, त्या महिला सक्षमीकरणाचे एक प्रमुख उदाहरण होत्या. यशस्वी शिक्षणतज्ज्ञ राजा नारायणलाल लाहोटी जी यांच्या मागे खंबीरपणे उभे राहून त्यांनी एका स्त्रीची गतिमान भूमिका सिद्ध केली. त्यांना अध्यात्मिकता आणि शिस्तीने वाढवले गेले.

राजा नारायणलालजी लाहोटी यांच्याशी लग्न झाल्यानंतर गरजूंना मदत करण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे कुटुंब परोपकाराच्या विचारसरणीला साथ देत राहिले. एक आधार देणारी पत्नी, काळजी घेणारी आई ही स्वातंत्र्यसैनिकाची आणखी एक बाजू आहे. निजाम राजवटीमुळे समाजावर झालेल्या अन्यायाविरुद्धच्या प्रत्येक चळवळीत त्या आपल्या कुटुंबाच्या मागे उभ्या राहिल्या. त्यांच्या योगदानाबद्दल महाराष्ट्र सरकारने १९९४ मध्ये त्यांना स्वातंत्र्य सेनानी हा किताब दिला. असे म्हटले जाते की जीवन देण्याने घडते आणि म्हणूनच त्यांचे जीवन हे जीवन कसे घडवता येते याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. त्या नेहमी म्हणायच्या की, देवाने सर्वांना अन्न आणि शिक्षणाची तरतूद केली आहे, गरजूंना अत्यंत आदराने अन्न देणे हाच पुण्य आहे. असे प्रस्तुत मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कुलसचिव प्रवीण शिवणगीकर, कॅप्तन बी के भालेराव, आशीद बनसोडे,संदीप केंद्रे, शैलेन्द्र डावळे, सुनील मुनाळे, विवेक डोंगरे, ज्ञानेश्वर यादव, मयूर पोतनीस, व्यंकटेश इबित्दार, मंगेश रंकाळे, नितीन पुंड, गजानन सोनी, अमृत पालवे, विकास बनसोडे, ज्ञानेश्वर गोसावी, तुषार यवनगे यांनी योगदान दिले.

## आनंदी जीवनशैली जगा अन् हृदयविकार टाळा : डॉ.पद्मावती बियाणी (तोष्णीवाल)

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर : सध्याचे युग हे अत्यंत धावपळीचे युग असून या युगात कामाचा अतिव्याप,आर्थिक प्रश्न,अपुरी झोप,खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी,बदलती जीवनशैली, सोशल मीडियाचा वाढता वापर अशा अनेक कारणांमुळे प्रत्येक माणूस वा विद्यार्थी ताणतणावांमध्ये जीवन जगतो आहे.तरी या धावपळीच्या युगात विद्यार्थ्यांनी,प्रत्येक माणसांनी सकारात्मक विचार,नवनवीन विषयावर वाचन करणे,जंकफूड खाणे टाळणे,पुरेशी झोप घेणे हृदयासाठी आवश्यक आहे.मानसिक ताणतणाव न घेता मनमोकळे आनंदी जीवन जगणे व चांगला सकस आहार घेणे ही आजच्या आधुनिक काळाची खरी गरज आहे.आनंदी जीवनशैली जगा अन् हृदयविकार टाळा,असे प्रतिपादन लातूर येथील कन्सल्टंट फिटल मेडिसिन ॲन्ड जेनेटिक्सच्या प्रसिद्ध डॉ.पद्मावती बियाणी यांनी केले.

लातूर येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी विज्ञान मंडळाचे उद्घाटन व तरुणांमध्ये वाढता हृदयविकाराचा झटका : प्रतिबंध आणि उपाय या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते.यावेळी ते प्रमुख पाहुणे व साधन व्यक्ती म्हणून बोलत होत्या.याप्रसंगी लातूर येथील कन्सल्टंट इंटरव्हेशनल कार्डीओलॉजिस्टचे प्रसिद्ध डॉ.मेहुल राठोड,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, कार्यक्रम समन्वयक प्रा.शिलेश गावित, डॉ.दीप्ती ढेरे,विज्ञान मंडळ अध्यक्ष यश झंवर व मंडळ सचिव ओंमकार चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना डॉ.मेहुल राठोड असे म्हणाले की, हृदयविकार टाळण्यासाठी संतुलित व आरोग्यदायी आहार घेणे,नियमित व्यायाम



करणे,कोलेस्ट्रॉल नियंत्रण ठेवणे, नियमित आरोग्य तपासणी करणे व पुरेशी झोप घेणे गरजेचे आहे.तसेच तरुणाईंनी धूम्रपान व तंबाखूजन्य पदार्थ व मद्यपान करणे टाळले पाहिजे.याचबरोबर वयाच्या दुसऱ्या वर्षापासूनच धमनी काठीण्य सुरू होते.प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीचे वय घसरले आहे,ते ३० वरून १३ वर आले आहे.ज्यांचा हृदयरोगाचा कौटुंबिक इतिहास आहे,त्यांनी वेळोवेळी हृदयरोगाशी संबंधित चाचण्या करून घ्याव्यात.धमनी काठीण्य हे केवळ हृदयाशीच नव्हे तर इतर अवयवाशीही संबंधित आहे.खाण्याच्या चुकीच्या सवयी,धूम्रपान,मद्यपान टाळून योग्य जीवनशैलीचा अवलंब केल्यास युवकांमध्ये येणारे हृदयरोग टाळता येऊ शकतात.खाण्याच्या सवयीमध्ये सूर्यफ ूल आणि करडई या तेलाचा वापर करावा.हृदयरोग टाळण्यासाठी शरीराचे जैविक घड्याळ किंवा लयबद्धता पाळणे आवश्यक आहे.

महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी हृदयरोग होण्याची कारणे व त्यावरील उपाय सांगत असताना विद्यार्थ्यांनी समाजजीवनात हृदयविकारासंदर्भात जनजागृती करावे असे ते म्हणाले.

प्रास्ताविक प्रा.शिलेश गावित यांनी केले तर आभार वैभवी मार्डीकर हिने मानले.सूत्रसंचालन प्रज्वल लामतूरे व अन्नपूर्णा टोकरे यांनी संयुक्तपणे केले.प्रमुख पाहुण्याचा परिचय काझी मैमूनाताझील हिने करून दिला.यावेळी डॉ.मनीषा गुरमे,डॉ.श्वेता लोखंडे,प्रा. ऐश्वर्या अंधारे,प्रा.पुजा नंदगावे तसेच विज्ञान मंडळाचे भुषनीकर आशिष,वीणा भंडारी,सूर्यवंशी सृष्टी,गोरड प्रिया,यश जोगदंड, कदम स्वागत,कापसे ओंमकार, कांबळे रणवीर,आयनुळे प्रसाद, सोहम बिराजदार,सय्यद महफुस,शेख उमेर इत्यादी उपस्थित होते.

## केशवराजमध्ये किशोरवयीन मुलींचे समुपदेशन संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि. २३ सप्टेंबर २०२५ मंगळवार रोजी उजास उपक्रम व सखी सावित्री समिती यांच्या संयुक्त विद्यमाने किशोरवयीन मुलींचे समुपदेशन संपन्न करण्यात आले.आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई उजास उपक्रमांतर्गत कार्यकर्त्या स्मितल उषा भागवत यांनी किशोरवयीन मुलींना समुपदेशन केले. याप्रसंगी मंचावर पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, सखी सावित्री समितीच्या सदस्या सुलक्षणा गंगथडे, तक्रार निवारण समिती सदस्या तेजस्विनी सांजेकर यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी स्मितल भागवत यांनी विद्यार्थिनींना वैयक्तिक स्वच्छता, आहार, मानसिक आरोग्याचे महत्त्व सांगितले. किशोरवयीन अवस्थेतील भावनिक बदल व त्याचे व्यवस्थापन, ताण-तणावाचे व्यवस्थापन याविषयी अतिशय सुंदर रीतीने मार्गदर्शन केले. मासिक पाळीच्या काळातील जागरूकता, त्यावेळी मुलींनी घ्यावयाची स्वच्छतेची काळजी याविषयी विविध चित्रांद्वारे तसेच व्हिडिओद्वारे समुपदेशन केले. विद्यार्थिनींना गुड टच व बॅड टच याविषयी माहिती सांगितली.

सखी सावित्री समिती अंतर्गत संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुलक्षणा गंगथडे यांनी केले. या कार्यक्रमास इयत्ता आठवीच्या एकूण २६८ विद्यार्थिनींची उपस्थिती होती.




प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.

शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# मराठवाड्यात मंत्रिमंडळाची बैठक घ्या!

## काँग्रेसचे प्रवक्ते तथा माजी आमदार धिरज देशमुख यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी: ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट मदत द्या

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यात प्राथमिक अंदाजानुसार अतिवृष्टीमुळे २६ लाख ३ हजार हेक्टरवरील खरीप पिकांचे नुकसान झाले आहे. यात सर्वाधिक नुकसान मराठवाड्यात झाल्याची नोंद आहे. सततच्या अतिवृष्टीमुळे, ठिकठिकाणी झालेल्या ढगफुटीमुळे बळीराजा अक्षरशः उद्ध्वस्त झाला आहे. त्यामुळे तातडीने मराठवाड्यात मंत्रिमंडळाची बैठक घ्यावी व मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट भरीव मदत द्यावी अशी मागणी काँग्रेसचे प्रवक्ते तथा माजी आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी केली

दुष्काळग्रस्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मराठवाड्याला यंदा पावसाने झोडपून काढले आहे. निसर्गाचा हा महाप्रलय आहे. पहिल्यांदाच मराठवाड्यात सर्वत्र पूरस्थिती निर्माण झाली आहे. पावसाने हाहाकर माजवल्यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत. त्यामुळे काँग्रेसचे प्रवक्ते तथा माजी आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन मराठवाड्यात मंत्रिमंडळाची बैठक घेऊन ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली आहे

गेल्या काही दिवसांपासून मराठवाड्यात मुसळधार पावसाने थैमान घातले आहे. लातूर, बीड, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड यासह अन्य जिल्ह्यात पूरस्थिती आहे. अनेक गावात पाणी शिरले आहे. शेतकऱ्यांची उभी पीके पाण्यात गेली आहेत. अनेकांच्या शेतात कमरेइतके पाणी पहायला मिळत आहे. त्यामुळे शेतीलाच तलावाचे स्वरूप आले आहे. मराठवाड्यात अनेक भागात पावसाने घातलेल्या या हाहाकारामुळे ऐन सणांच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या संसाराची राखरांगोळी झाली आहे. याकडे काँग्रेसचे प्रवक्ते तथा माजी आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधून घेतले आहे

**आतापासूनच दीर्घकालीन उपाय आवश्यक**

मराठवाड्यात अनेक ठिकाणी पूरस्थिती आहे. पूर ओसरल्यानंतर त्या भागात रोगराई पसरण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे आरोग्य विभागाला सतर्क करणे गरजेचे बनले आहे. याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घ्यायला हवा. पुरामुळे अनेकांचा संसार वाहून गेला आहे. अशांचा संसार पुन्हा उभा करणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे. पशुधन, अवजारे, स्प्रिंकलर, पाईप, मोटारी, पत्रे या वस्तूही पुराच्या पाण्यात वाहून गेल्या आहेत. याबाबतही सरकारने ठोस निर्णय घ्यायला हवा. अतिवृष्टी आणि ढगफुटीमुळे खरीप हंगाम वाया गेला. आता रब्बी हंगामही गेलाच आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा उभं कसं करता येईल हे सरकारने पाहायला पाहिजे. यंदासारखी अतिवृष्टी मराठवाड्यात पुन्हा झाली तर त्याला तोंड कसं देता येईल, नुकसान कसे टाळता येईल याचाही सरकारने गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. म्हणून दीर्घकालीन उपायांसाठी मंत्रिमंडळाची बैठक मराठवाड्यात होणे आवश्यक आहे असे काँग्रेसचे प्रवक्ते तथा माजी आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी सांगितले



## डॉ. उमाकांत जाधव यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्काराने सन्मानित

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री. शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक डॉ. उमाकांत लक्ष्मणराव जाधव यांना मुंबई येथील टाटा थिएटर, नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस् येथे उपमुख्यमंत्री अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, कौशल्य-रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा, माहिती व तंत्रज्ञान सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, लोकसभा सदस्य अरविंद सावंत, विधान परिषद सदस्य ज. मो. अभ्यंकर, प्रधान सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग रणजीतसिंग देओल, आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य सचिन्द्र प्रताप सिंह यांची प्रमुख उपस्थिती होती. पुरस्कार स्वीकारताना त्यांच्या मातोश्री श्रीमती कलावतीबाई जाधव, पत्नी योगिता जाधव, मुले चि. आदित्य जाधव व अर्णव जाधव हेही उपस्थित होते.

डॉ. उमाकांत जाधव यांनी सातत्याने विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक व संशोधनात्मक उपक्रमांद्वारे उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांचातील अभ्यासू वृत्ती, संशोधनाची आवड, उपक्रमशीलता आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी त्यांनी राबवलेले प्रयत्न विशेष उल्लेखनीय ठरले आहेत. डॉ. उमाकांत जाधव यांनी चला करू पुस्तकांशी मैत्री हा वाचन उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजवली. या उपक्रमाला राज्यस्तरीय पारितोषिक मिळाले असून त्यांनी केलेली ई-साहित्य निर्मितीही राज्यस्तरावर गौरवली गेली आहे. विचारशलाकाव महाराष्ट्र वार्षिकी या प्रतिष्ठित नियतकालिकांच्या संपादक मंडळावर त्यांनी काम केले त्यांनी अनेक लेख प्रकाशित केले आहेत. या संपूर्ण योगदानाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार व शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या हस्ते डॉ. उमाकांत जाधव यांना क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



## शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त आजपासून लातुरात ७२ तास अखंड संगीत महायज्ञ



**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री ज्ञान सरस्वती प्रतिष्ठान, सरस्वती संगीत कला महाविद्यालय,लातूर आणि मराठवाडा संगीत कला अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दिनांक २६ ते २९ सप्टेंबर २०२५ यादरम्यान श्री ज्ञान सरस्वती मंदिर संस्थान सभागृह, संगीत नगरी,बार्शी रोड, लातूर या ठिकाणी ७२ तास अखंड संगीत महायज्ञाचे आयोजन करण्यात आले असून या अखंड संगीत महायज्ञाचे उद्घाटन शुक्रवार दि.२६ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजता राज्याचे सहकार मंत्री मा. नामदार श्री. बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते होणार असून याप्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या संगीत महोत्सवात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कलावंत आपली संगीत सेवा रुजू करणार आहेत.७२ तास अखंडपणे चालणाऱ्या या संगीत महोत्सवात जयपूर आत्रोली घराण्याच्या सुविख्यात गायिका विदुषी विद्या भागवत यांचे सुश्राव्य गायन, मुंबई येथील सुप्रसिद्ध सितारवादक पं. मारुती पाटील यांचे सितार वादन,सुप्रसिद्ध कथक नृत्यांगना पंडिता रूपाली देसाई व दिशा देसाई (मुंबई) यांचे कथक नृत्य, तसेच मुंबई येथील युवा हार्मोनियम वादक ऋतुजा कुंटे यांचे सोलो हार्मोनियम वादन,तसेच कार्तिकीयन स्वामी यांचे तबला वादन, मुंबई येथील गायक नागनाथ पाटील यांचे गायन,प्रा.अनिल डोळे व शिष्यवृंद यांचे सुश्राव्य तबला सोलो वादन,सोलापूर येथील डॉ.संध्या जोशी यांचे गायन, तसेच नागपूर येथील युवा सितारवादक गरिमा व रिद्धीमा यांचे सितारवादन, ह.भ.प. नारायण महाराज चाकरवाडीकर उत्तरेश्वर पिंपरी यांचे हरी कीर्तन, सोलापूर येथील प्रभाकर वाघचौरे आणि अनिरुद्ध वाघचौरे यांचे गायन,श्वेता तंत्रे पाटील यांचे कथक नृत्य, शिवरुद्र स्वामी यांचे गायन,गानसरस्वती किशोरी अमोणकर यांच्या पट्टशिष्या मधुवंती बोरगावकर देशमुख यांचे सुश्राव्य गायन तसेच सरस्वती बोरगावकर शीलवंत यांचे गायन,लातूरचा सुविख्यात सिनेपार्श्वगायक मंगेश बोरगावकर यांचे गायन,याबरोबरच अनेक सुविख्यात कलावंतांचे कलाविष्कार या संगीत महायज्ञाप्रसंगी सादर होणार आहेत. तसेच याप्रसंगी मराठवाड्यातील सर्व संगीत शिक्षक आणि कलावंतांचा सन्मान सोहळा संपन्न होणार आहे.

तरी जास्तीत जास्त रसिक श्रोत्यांनी या संगीत महायज्ञाप्रसंगी उपस्थित राहून या संगीत मेजवानीचा आस्वाद घ्यावा असे आवाहन संयोजक तालमणी डॉ.राम बोरगावकर यांनी केले आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. गणेश बोरगावकर,प्रा.लक्ष्मण श्रीमंगले, प्रा.विश्वनाथ स्वामी, प्रा.विजयकुमार धायगुडे, सौ सुवर्णा कुंटे,सौ सुनीता बोरगावकर, प्रभारी प्राचार्य डॉ. सुदाम पवार,डॉ.बालाजी शिंदे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारीवृंद परिश्रम घेत आहेत.


निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र

सितारी विमा सेवा केंद्र

दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.

वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत

जमीरोद्दीन सितारी

चेअरमन क्लब मेंबर CLIA

एजंट भरती चालू आहे.

संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


### कुष्माडीमा ..

चवथी माळ जपता
आगळी येते स्फुर्ती
स्मित हास्य करता
करे ब्रह्मांड निर्मीती

सर्वांत तेजस्वी रुप
त्रिखंडा तिची किर्ती
सिंहा रुढ महामाया
सूर्य मंडळात वसती

अष्ट भुजा आदिती
आयुधे शोभे हाती
मुखकमल ओजस्वी
उजळे सहस्त्रज्योती

प्रिय तिज कोव्हळा
भक्तांवर अति प्रिती
साधक मन मग्न हो
अनाहत चक्र स्थिती

गरबा दांडिया खेळा
फुले सुरेख संस्कृती
संपून जाता दुरावा
जोडली जाती नाती

कुंकममार्चन सश्रध्दे
श्री सूक्त सप्त शती
गोंधळ दुर्गामातेस्तव
गायन नर्तन शुभराती

आईचा जयघोष हो
अचंचल मनाआरती
जगदंबा शरणागती
मनी जागृत आकृती

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## वीजभार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजूरी; महावितरणकडून तत्पर ग्राहकसेवेचा नवा अध्याय सुरू

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**लातूर/प्रतिनिधी :** महावितरणच्या लघुदाब वर्गवारीतील सर्व औद्योगिक, व्यावसायिक, घरगुती व इतर ग्राहकांच्या १५७ केडब्लूपर्यंत वीज भार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना महावितरणकडून स्वयंचलित पद्धतीने मंजुरी देण्यास प्रारंभ झाला आहे. महावितरणच्या संकेतस्थळावर ही स्वयंचलित प्रणाली कार्यान्वित झाली आहे. त्यामुळे पायाभूत यंत्रणा उभारण्याची गरज नाही अशा ठिकाणी ग्राहकांनी नियमानुसार शुल्काचा भरणा केल्यानंतर केवळ २४ ते ४८ तासांमध्ये मागणीप्रमाणे वाढीव वीजभार स्वयंचलित पद्धतीने मंजूर व कार्यान्वित होणार आहे.

राज्याचे मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस यांनी वीजग्राहकांना 'इज ऑफ लिव्हिंग'नुसार (राहणीमान सुलभता) सेवा देण्याची सूचना केली आहे. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी लघुदाब वर्गवारीतील सर्व ग्राहकांसाठी वीज भारात वाढ किंवा कमी करण्याची प्रक्रिया ऑनलाइनद्वारे स्वयंचलित करण्याचे निर्देश दिले. त्यासाठी ऑनलाइन प्रणाली विकसीत करून दि. १७ सप्टेंबर ते दि. २ ऑक्टोबरच्या सेवा पर्वाचे औचित्य साधून ही सुविधा सुरू करण्यात आली आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या जोडणीच्या वीजभारामध्ये (Load Change/Demand Change) करारापेक्षा आणखी वाढ करणे किंवा कमी करण्याची सोय महावितरणच्या www.mahadiscom.in संकेतस्थळावर किंवा मोबाइल ॲपवर ग्राहकांना स्वतःच्या लॉगीनद्वारे उपलब्ध आहे. मात्र मंजूरीची प्रक्रिया स्वयंचलित नसल्याने पुढील कार्यवाहीसाठी बराच वेळ लागत होता. आता १५७ किलोवॅटपर्यंतच्या वीज भाराच्या वाढीसाठी स्वयंचलित मंजूरी देण्यात येणार आहे. वीज भार वाढीबाबत ऑनलाइन मागणी नोंदविल्यानतंर संबंधित ग्राहकांना स्वयंचलित पद्धतीने कोटेशन देण्यात येईल. तर कोटेशनचे शुल्क भरण्याची देखील ऑनलाइन सोय आहे.

लघुदाब वर्गवारीमध्ये शून्य ते ७.५ किलोवॅट, ७.५ ते २० किलोवॅट आणि २० ते १५७ किलोवॅट असे वीजभाराचे तीन गट आहेत. या तिनही गटात वीज भार वाढीच्या मंजूरीसाठी स्वयंचलित प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. ग्राहकांना केवळ संकेतस्थळ किंवा मोबाईल ॲपद्वारे ऑनलाइन अर्ज करावा लागेल व नियमानुसार शुल्क भरावे लागेल. त्यापुढील सर्व प्रक्रिया महावितरणकडून स्वयंचलित पद्धतीने होणार आहे. त्याची माहिती संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांक किंवा ई-मेलद्वारे कळविण्यात येणार आहे.

वीजग्राहकांनी आवश्यक शुल्काचा भरणा केल्यानंतर नवीन मीटर बसविण्याची किंवा पायाभूत वीजयंत्रणा उभारण्याची गरज नसेल अशा नसेल, अशा वीजजोडणीचा वाढीव वीज भार स्वयंचलित प्रणालीने मंजूर होईल व केवळ २४ तासांत कार्यान्वित होईल. वाढीव वीजभाराच्या आवश्यकतेनुसार किंवा सिंगलऐवजी थ्री फेजची मागणी असल्यास नवीन मीटर लावण्यात येते. अशा ठिकाणी नवीन वीज मीटर लावण्याचा आदेश स्वयंचलितपणे संबंधित एजन्सीला देण्यात येईल. त्यामुळे नवीन वीजमीटरची आवश्यकता असलेल्या ठिकाणी देखील साधारणतः ४८ तासांमध्ये वीज भार वाढीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

यासह ज्या वीजजोडणीचा करारापेक्षा अधिक वीज भार वाढविण्यासाठी पायाभूत यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आहे, त्याठिकाणी महावितरणद्वारे पायाभूत यंत्रणा उभारण्यात येईल. त्याबाबत स्वयंचलितपणे निवडसूचीवरील संबंधित एजन्सीला कळविण्यात येईल. पायाभूत यंत्रणा उभारण्याचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात येईल. या प्रक्रियेची माहिती वेळोवेळी संबंधित ग्राहकांना कळविण्यात येईल.

लघुदाब वर्गवारीमध्ये वीज भार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित पद्धतीने मंजूरी देण्याच्या निर्णयामुळे महावितरणच्या ग्राहकसेवेचा नवा अध्याय सुरू झाला आहे.

त्याचा प्रामुख्याने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेसाठी घरगुती ग्राहकांना तसेच प्रामुख्याने औद्योगिक, व्यावसायिक व इतर लघुदाब ग्राहकांना मोठा लाभ होणार आहे.


मध्य रेल्वे
विद्युत विभाग
विद्युत काम
ई-निविदा सूचना

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता जनरल, मध्य रेल्वे, सोलापूर मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि रेल्वे ई-खरेदी वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवीत आहेत. **निविदा क्रमांक:** SUR/L/T/2025/17 **कामाचे नाव:** सोलापूर विभागातील धाराशिव रेल्वे स्टेशन क्वार्टर्स येथे ११ केव्ही एचटी लाईनच्या स्थलांतराच्या संदर्भात कामाचा विद्युत जनरल सेवा भाग. **अंदाजे किंमत:**- ९८७६१०.६६/-, **बोली सुरक्षा:**- १९,८००.००/- **पूर्णता कालावधी:**- ०४ महिने, **ऑफरची वैधता:**- ६० दिवस, **वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:**- १७/१०/२०२५ रोजी १५:०० वाजता. बोली सुरक्षा खर्च www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरला जाईल.

SUN 78 — वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (सामान्य)

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे



मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
साहित्य खरेदी

विभागीय भांडार कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर यांच्या वतीने आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीन सक्षम,नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-खरेदी वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवीत आहे: **निविदा क्रमांक: 9625SWT03**, **क्रमांक** १, **पीएल कोड (गट)** - 96NS155, **वस्तू प्रकार GST(Y/N)** - वस्तू (Y), **स्टॉक/नॉन-स्टॉक** नॉन-स्टॉक, **ऑर्डरिंग** ----, **Eval साठी विचारात घ्या.** -होय, **मान्यता देणारी संस्था** - आरडीएसओ, **तपासणी संस्था** - टीपीआय एजन्सी, **चलन परवानगी** - रुपये, **अंदाजे दर** - **वर्णन:** १०१२५ मिमी प्री-कर्व्हड/कर्व्हड स्विचचे उत्पादन आणि पुरवठा ज्यामध्ये ZU-1-60/60E1-1 जाड वेब ग्रेड R-260 प्राइम क्वालिटी टंग रेल आणि स्टॉक रेल लवचिक फास्टनर्स आणि स्प्रिंग ऑपरेटेड सेटिंग डिव्हाइससह आहेत. (आरडीएसओ-टी/६२१६ बदलांसह वाचा), पूर्ण (चेक रेलसह) १ इन १२ साठी सर्व फिटिंगसह, पीएससी स्लीपरवर फॅन आकाराच्या लेआउटसाठी ६० किलो टर्न आउट म्हणजेच सब असेंब्ली ड्रॉइंगनुसार स्विच भागासाठी सर्व फिटिंग. क्रमांक टी-६१५५ (अल्ट. १३) (नवीनतम बदलांसह वाचा) आरडीएसओच्या मानक ड्रॉइंग क्रमांक ६१५४ (नवीनतम बदलांसह वाचा) नुसार मानक फिश प्लेट्स, फिश बोल्ट आणि नट्स ईआर क्लिप, इन्सुलेटिंग लाइनर्स वगळता. तपशील: i) IRS - T-10-2025-जाड वेब स्विचेससाठी, ii) जाड वेब असममित रेलच्या एंड फोर्जिंगसाठी IRS -T-62 2025. टीप: (१). प्री-कर्व्हिंग RDSO पत्र क्रमांक CT/PTX/TWS/डिझाइन दिनांक ०६.०७.२०२३ नुसार केले जाईल. टीप:- ख) टंग रेलसाठी Zu-1 60/60E1-1 जाड वेब R-260 रेलची व्यवस्था विक्रेत्याने स्वतःच्या खर्चाने केली पाहिजे. स्टॉक रेल आणि चेक रेल (R-260) साठी रेलची व्यवस्था पुरवठादाराने रेल्वे बोर्ड पत्र क्रमांक २०२२/ट्रॅक-I(P)/फॅब्रिकेटर्स दिनांक २४.०१.२०२२ आणि ३१.०७.२०२३ नुसार त्यांच्या स्वतःच्या खर्चाने केली पाहिजे. II) नवीनतम बदल म्हणजे या ई-निविदा बंद होण्याच्या तारखेला RDSO ने जारी केलेले नवीनतम बदल असतील. कव्हरेज पीओ सोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ मध्ये एलएच/आरएच प्रमाण दिले जाईल. वक्र/पूर्व-वक्र प्रमाण- पदवीसह समान/विरुद्ध फ्लेक्सर कव्हरेज पीओ सोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ मध्ये दिले जाईल **[वॉरंटी कालावधी:** डिलिव्हरीच्या तारखेपासून ३० महिने] **प्रमाण सहनशीलता** (+/-): ०% वय, **आयटम श्रेणी:** सामान्य एकूण पीओ मूल्य फरक कमाल परवानगी: ८ लाख. **कन्साइनी**-एसएसई/पी-वे/स्टोअर/एसयूआर, महाराष्ट्र, १०० संच. **यूव्हीएएम आयटम संदर्भ** - (आयटम आयडी: - ३१००५८२ - जाड वेब स्विचेस, जाड, सब आयटम आयडी:- ३१००५८२००१ - जाड वेब स्विचेस). **तपासणी तपशील** उत्पादन तपासणी: टप्पा १: धातूशास्त्रीय आणि आयामी तपासणी (पीओ प्रमाणाच्या १००%), टप्पा २: अंतिम तपासणी (पीओ प्रमाणाच्या १००%). संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in.

वरिष्ठ विभागीय साहित्य व्यवस्थापक

SUN 80 — अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है



टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-

मास्टर प्लेट ट्रेसिंग क्वालिटी

संपर्क 8600025070 9028376965

प्रिंटर्स पॅराडाईस

प्रिंटर रिपेअरिंग

कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस

टोनर रिफिलिंग



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६